




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ४८ * नांदेड * शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




# ‘जय जिजाऊ, जय शिवराय’च्या घोषणांनी नांदेड दणाणले

## भव्य मिरवणुका, अभिवादन सोहळे, शिवप्रेमींचा उत्साह; ‘जय भवानी, जय शिवाजी’चा गजर

**नांदेड (प्रतिनिधी)–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी शहरात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले. सकाळपासूनच शहरातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पूर्णाकृती पुतळ्याजवळ शिवप्रेमींची मोठी गर्दी होती. विविध राजकीय पक्ष व संघटनांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शिवभक्त व नागरिकांच्या हस्ते राजेंच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवजयंतीनिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळा परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरातून महिलांनी भव्य अशी मशाल रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. जयंतीनिमित शहरात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरात जयंतीनिमित्त शुभेच्छांचे ठिकठिकाणी कटआऊट व बॅनर लावण्यात आले. छावा संघटनेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला. महापौर कविता संतोष मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. माजी मंत्री डी. पी. सावंत, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, माजी आ. सुभाष साबणे, माजी आ. अविनाश घाटे, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, नगरसेवक किशोर स्वामी, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, माधव पावडे, गणेश तादलापूरकर, दिलीपसिंघ सोडी, भाजपचे महानगर उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे, बाबुराव पुजरवाड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, नगरसेवक यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

शिवजयंतीनिमित्त तरुणांनी भव्य दुचाकी रॅली काढून रयतेच्या राजाला अभिवादन केले. ठिकठिकाणी विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सामाजिक व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्यावतीने अनेक ठिकाणी खिचडी, पाणी वाटप करण्यात आले. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व अन्य संघटनांच्यावतीने नवामोंढा येथे शिवजयंतीनिमित्त भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक देखाव्यासह काढण्यात आली होती. आणि मिरवणुकांमध्ये बालगोपालांनी दिंडीद्वारे सहभाग नोंदवत राजांना अभिवादन केले. जुन्या नांदेड भागातील शिवजयंती मिरवणुकांमध्ये सुंदर असे देखावे करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावरती कागदी पुष्पांची उधळण करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत मिरवणुका सुरू होत्या. शहरात काही ठिकाणी मिरवणूका न काढता जाग्यावर छत्रपती शिवाजी राजेंना अभिवादन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव, सहायक पोलीस अधीक्षक शशांथ गौडा, उपविभागीय पोलरस अधिकारी रामेश्वर व्यंजने, इतवाराचे प्रशांत





शिंदे व शहरातील सर्व ठाणेदार यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत चोख बंदोबस्त तैनात ठेवला होता.









# अर्धापूर-लहान वळण रस्त्यावर सुरक्षा कठडे नसल्याने ३० फूट खोल ऑटो कोसळून ६ जखमी



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** अर्धापूर-तामसा राष्ट्रीय महामार्गावरील लोणी गावाजवळ एका रिक्षाचा भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने प्रवाशांनी भरलेला ॲपे ऑटोरिक्षा थेट ३० फूट खोल कोसळला. या अपघातात बालकासह सहा जण जखमी झाले असून तिघांची प्रकृती गंभीर आहे.

चेनापूर तांडा येथील प्रवाशांना घेऊन ॲपे ऑटोरिक्षा लहानमार्गे अर्धापूरकडे येत होता. लोणी गावाजवळ असलेल्या जुन्या नदीच्या पुलावरील रस्ता ओबडधोबड असल्याने चालकाचे ऑटोवरील नियंत्रण सुटले. त्यातच पुलाला कठडे नसल्याने ऑटो रस्त्यावरून २५-३० फुट खाली कोसळला. या अपघातात ऑटो पूर्णपणे दबला गेला असून प्रवाशांच्या ओरडण्याने परिसर हादरून गेला. अपघात घडताच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ अर्धापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर गंभीर जखमी असल्याने तिघांना विष्णुपुरी (नांदेड) येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. यात शकुंतला दशरथ पवार (४६), रा. अर्धापर, पुजा आकाश चव्हाण (२६), रा. चेनापूर तांडा, रंजना लक्ष्मण राठोड (३०), रा. चेनापूर तांडा असून या व्यतिरिक्त भुलनबाई दिलीप चव्हाण (५०), रोहन विजय पवार (२५) आणि एका लहान बालक रा. चेनापूर तांडा यांच्यावर अर्धापूर येथे उपचार सुरू आहेत.

# जालना रेल्वे आरक्षण कार्यालय काऊंटरवर दलाल ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** रेल्वे आरक्षण प्रणालीतील बेकायदेशीर दलाली रोखण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन उपलब्ध या मोहिमेअंतर्गत सीआयबी/डी ॲण्ड आय, आरपीएफ नांदेड विभाग व रेल्वे प्रोटेक्शन फोर्स पोस्ट जालना यांच्या संयुक्त पथकाने बुधवारी जालना रेल्वे स्थानकावरील रेल्वे तिकीट आरक्षण काऊंटरवर एका दलालास ताब्यात घेतले.

दि. १८ फेब्रुवारी रोजी एएसआय अमोल वावळे, कॉन्स्टेबल रणजित सिंघ, सहायक पोलीस निरीक्षक विजय वाघ, तसेच आरपीएफ पोस्ट जालना येथील कर्मचाऱ्यांनी जालना रेल्वे स्थानकावरील पीआरएस येथे विशेष तपासणी मोहीम राबविली. यावेळी जालना शहरातील एका व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून १ हजार २७० रुपये किमतीची दोन रेल्वे आरक्षण काउंटर तिकिटे, २ भरलेले आरक्षण मागणी अर्ज तसेच ५ कोरे आरक्षण मागणी अर्ज जप्त करण्यात आले.

सदर प्रकरणात जप्ती पंचनामा तयार करून आरोपीचा कबुलीजबाब नोंदविण्यात आला. याप्रकरणी रेल्वे कायदा कलम १४३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रमजान महिन्यात कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीस प्रशासन सज्ज -अबिनाश कुमार


**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी काळात साजरा होणाऱ्या रमजान ईद सणात कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले. पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक कार्यालयात सर्व संबंधित विभागांची उच्चस्तरीय समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती, यावेळी त्यांनी माहिती दिली.

सदर बैठकीस शहरातील प्रमुख मशिदींचे प्रमुख, मौलाना, मुफ्ती तसेच नांदेड महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, जिल्हा शल्यचिकीत्सक, अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच इतर शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान रमजान कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वंकष नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नमाज वेळेस आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवणे, संवेदनशील भागांमध्ये विशेष तैनाती करणे, सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे सतत देखरेख ठेवणे, नियमित पायदळ व मोटार गस्त वाढविणे, तसेच वाहतूक व्यवस्थापन सुरळीत ठेवण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

तसेच विज, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती व आरोग्य सेवा या अत्यावश्यक सुविधा अखंडित व सुरळीत राहतील याबाबत संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले.

सामाजिक सलोखा बिघडविण्याचा कोणताही प्रयत्न, अफवा पसरविणे, बेकायदेशीर जमाव जमविणे अथवा कायद्याचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक यांनी दिला.



# शिवरायांच्या विचारांचे अनुकरण करणे गरजेचे -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## देशमुख, वाडेकर, जाधव, पाटील, कदम, गायकवाड यांना पुरस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवरायांच्या विचारांचे अनुकरण करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व इतर कक्ष आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती नवा मोंढा नांदेड येथे छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, शिवरायांच्या राज्यात सर्व जाती-धर्माचे लोक एकोप्याने आणि आनंदाने राहत होते व त्यांचा महाराजांवर पुर्ण विश्वास होता हे अनेक लेखकांच्या पुस्तकांचा संदर्भ देत मनोगत व्यक्त केले.

प्रमुख वक्ते साहेब खंदारे यांनी शिवरायांच्या काळातील लढाया या सत्तेसाठी होत्या धार्मिक नव्हत्या. कारण छत्रपती शिवाजी महाराज हिंदू-मुस्लिम असा भेद करत नव्हते स्वराज्यात समानता होती, असे मत व्यक्त केले. दिवाळीपेक्षाही मोठ्या प्रमाणात शिवजन्मोत्सव साजरा होत आहे. मराठा सेवा संघ विविध उपक्रम राबवित जाते. त्यांचे उपक्रम समाजोपयोगी असतात असे मत अध्यक्षस्थानावरून आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी मांडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री डी.पी. सावंत यांचे हस्ते झाले. सावंत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातीला सोबत घेऊन कार्य केले, त्याचप्रमाणे मराठा सेवा संघ सर्व समाजाला सोबत घेऊन कार्य करत आहे. नांदेड मधील मराठा सेवा संघाचे कार्य कौतुकास्पद आहे, असेही ते म्हणाले. आ.बालाजी कल्याणकर व महापौर कविता मुळे यांनीही मनोगत व्यक्त केले.



मान्यवरांच्या हस्ते मराठा भुषण पुरस्कार डॉ. सुधीर देशमुख यांना देण्यात आला. जिजाऊरत्न पुरस्कार डॉ. गायत्री वाडेकर यांना देण्यात आला. पहिल्या महिला डॉक्टर यांच्या नावे देण्यात येणारा डॉ. रखमाबाई सावे पुरस्कार डॉ. पुष्पा गायकवाड यांना देण्यात आला. कृषी क्षेत्रातील मराठा सेवा संघ कृषी भुषण पुरस्कार सदाशिव पाटील व उद्धव कदम यांना तर शिक्षण क्षेत्रातील सावित्रीबाई फुले पुरस्कार लक्ष्मीबाई जाधव यांना देण्यात आला. विविध स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी एक शिवविवाह ही लावण्यात आला.

कार्यक्रमास आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.बालाजी कल्याणकर, महापौर कविता मुळे, माजी मंत्री डी.पी. सावंत, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, संध्याताई कल्याणकर, नगरसेविका जयश्री पावडे, नगरसेवक सतीश देशमुख, डॉ. रेखा पाटील, माधव पावडे, माजी नगरसेविका डॉ.करुणा जमदाडे, गोविंदराव नागेलीकर, विठ्ठल पावडे, स्वराज्य पक्षाचे माधव देवसरकर, तिरुपती कौंठेकर, छावाचे जिल्हाध्यक्ष दशरथ कपाटे, सुनिल कदम, मराठा सेवा संघाचे प्रदेश सहसचिव डॉ. पंजाबराव चव्हाण, मधुकर देशमुख, इंजि. शे. रा.पाटील, इंजि.व्ही. टी.शिंदे, सोपान क्षीरसागर, माणिकराव हेंद्रे, पंडीत कदम, संतोष देवराये, मराठा सेवा संघाचे उद्धव सुर्यवंशी, नानाराव कल्याणकर, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, परमेश्वर पाटील, भगवान कदम आदींची उपस्थिती होती.

शिवजन्मोत्सव साजरा करण्यासाठी ज्यांनी-ज्यांनी **(पान ३ वर...)**

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ‘ध’ चा ‘मा’ कोणी केला?

आपल्या इतिहासामध्ये ‘ध’ चा ‘मा’ केल्याचे एक काळेकुट्ट प्रकरण आहे. इतिहासातले हे एकमेव उदाहरण नसून स्वतंत्र प्राप्तीनंतर आतासुद्धा अशी अनेक प्रकरणं झाली आहेत व होत आहेत. गोपीनाथ मुंडे, विनायक मेटे आणि आता अजितदादा पवार. याबाबत पोलीस यंत्रणा आणि राजकीय लोक डोळे बांधून बसले असले तरी जनमनसाला मात्र ते स्पष्टपणे दिसते आहे, पण तिच्या हातात पाच वर्षाला एकदा मतदान करण्याशिवाय काहीही राहिले नाही. म्हणून अजितदादांसारख्या नेत्यांचा घात झाला असावा का? अशी कुजबुज जनतेमध्ये चालू आहे. म्हणूनच आता दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत नव्या शंका आणि आरोपांची मालिका सुरू झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी तीन वेळा घेतलेल्या पत्रकार परिषदेत या अपघातामागे पायलटचा वापर करून घातपात करण्यात आल्याचा गंभीर दावा केला आहे. या दाव्यामुळे आधीच भावनिक वातावरणात असलेल्या जनतेमध्ये संभ्रम आणि अस्वस्थता वाढली आहे. विमान अपघातासारख्या संवेदनशील घटनेत घाईगडबडीत कोणतेही निष्कर्ष काढणे योग्य नाही. मात्र रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर तपास व्हायला हवा. त्यांनी म्हटले की, नियमानुसार ५ हजार मीटर दृश्यमानता आवश्यक असताना त्या दिवशी केवळ ३००० फुट दृश्यमानता होती. अशा परिस्थितीत विमानाने उड्डाणच करू नये, असा त्यांचा दावा आहे. पहिली फेरी पूर्ण झाल्यानंतर दृश्यमानता नसताना देखील विमान मुंबईला परत का आणले गेले नाही, याबाबतही त्यांनी संशय व्यक्त केला आहे. अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स खराब झाल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, अशा यंत्रणेची रचना अत्यंत मजबूत असते आणि ती भीषण अपघातातही सुरक्षित राहते, असे तज्ज्ञांचे मत असते. त्यामुळे ब्लॅक बॉक्सच्या स्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. पवार यांनी डीजीसीएने १६ सप्टेंबर २०२१ रोजी दिलेले एअरवर्थिनेस अर्थात उड्डाण योग्य प्रमाणपत्र आणि २७ डिसेंबर २०२२ चे नोंदणी प्रमाणपत्र यातील विसंगती अधोरेखित केली आहे. इंजिनचा उड्डानक्षम कालावधी संपलेला होता, असा आरोपही करण्यात आला आहे. जर हे आरोप तथ्यांवर आधारित असतील, तर हा केवळ निष्काळजीपणा नसून गंभीर प्रशासकीय त्रुटी ठरू शकतात. या प्रकरणात नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू यांचे नावही चर्चेत आले आहे. विमान चालवणाऱ्या कंपनीच्या मालकांशी त्यांचे ‘मैत्रीपूर्ण’ संबंध असल्याचा आरोप करत निष्पक्ष चौकशीबाबत शंका उपस्थित करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत मंत्र्यांना पदावरून दूर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. राजकारणात आरोप-प्रत्यारोप नवीन नाहीत. परंतु एखाद्या लोकप्रिय नेत्याच्या मृत्यूभोवती जर शंका निर्माण होत असतील, तर त्या दूर करणे ही शासनाची जबाबदारी ठरते. अन्यथा अफवा आणि कुजबुज यांना खतपाणी मिळते. या चर्चांना ठोस पुरावे नसले, तरी संशयाचे वातावरण निर्माण होणे हेच चिंताजनक आहे. जेव्हा अधिकृत माहिती उशिरा येते किंवा ती अपुरी वाटते, तेव्हा अफवा वेगाने पसरतात. कंपनीच्या मालकाचा मुलगा रोहित सिंग अमेरिकेत गेल्याचा दावा आणि त्याला देशाबाहेर कसे जाऊ दिले, हा प्रश्नही उपस्थित झाला आहे. तसेच अजित पवार गटाच्या नेत्यांनी घटनेनंतर २० दिवसांनी सीबीआय चौकशीची मागणी का केली, हा विलंब संशयास्पद असल्याचेही रोहित पवार यांनी म्हटले आहे. या सर्व गोष्टींचा सखोल तपास आवश्यक आहे. विमान अपघातांची चौकशी ही तांत्रिक, वैज्ञानिक आणि निष्पक्ष पद्धतीनेच व्हायला हवी. भावनिक किंवा राजकीय दबावाखाली घेतलेले निर्णय सत्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. तज्ज्ञ समिती नेमून सर्व तांत्रिक बाबींची बारकाईने तपासणी करणे, ब्लॅक बॉक्सचे स्वतंत्र विश्लेषण करणे आणि सर्व संबंधितांची चौकशी करणे गरजेचे आहे. लोकशाहीत पारदर्शकता हीच विश्वासाची गुरुकिल्ली असते. जर खरोखरच हा अपघात असेल, तर तसे स्पष्ट व्हावे; आणि जर कोणताही घातपाताचा पुरावा आढळला, तर दोषींना कठोर शिक्षा व्हावी. दोन्ही परिस्थितीत सत्य बाहेर येणे अत्यावश्यक आहे. दादांच्या मृत्यूभोवती निमर्ण झालेला संशयाचा धुरळा केवळ राजकीय नाही, तर सामाजिकही आहे. लोकांच्या मनातील प्रश्न अनुत्तरित राहिल्यास लोकशाहीवरील विश्वास डळमळीत होतो. म्हणूनच, या प्रकरणात कोणतीही ढिलाई न करता, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून सत्य जनतेसमोर आणणे ही काळाची गरज आहे.

# हवामान साक्षरता : शेतकऱ्यांची नवी गरज



भारतीय शेती ही आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गाच्या चक्रावर अवलंबून आहे. विशेषतः लहान व मध्यम शेतकरी हे प्रामुख्याने पावसावर आधारित शेती करतात. अशा परिस्थितीत हवामानाच्या बदलत्या स्वरूपाचा थेट परिणाम त्यांच्या उत्पादनावर, उत्पन्नावर आणि जीवनमानावर होतो. मागील काही दशकांमध्ये हवामानाच्या चक्रात झालेला बदल, अति पावसाचे प्रमाण, वेळेआधी किंवा उशिरा पडणारे वादळ, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, अयोग्य तापमान हे सगळं शेतीच्या दृष्टिकोनातून गंभीर ठरत आहे. यामुळेच आजच्या काळात ‘हवामान साक्षरता’ ही केवळ पूरक गोष्ट न राहता, शेतकऱ्यांसाठी एक नवी अत्यावश्यकता बनली आहे.

‘हवामान साक्षरता’ म्हणजे फक्त हवामानाचा अंदाज ऐकणं नाही; तर हवामान बदल, त्याची पिकांवर होणारी संभाव्य परिणाम, त्यावरील अन्नद्रव्यांची गरज, कीड व रोगप्रादुर्भावाचे चक्र, आणि हवामानाशी सुसंगत पीक निवड या साऱ्यांची समज. हे म्हणजे केवळ विज्ञान नव्हे, तर शाश्वत शेतीसाठी आवश्यक निर्णयक्षमतेचं प्रशिक्षण आहे. शेतकऱ्यांनी पावसाच्या तारखा, दिशा व प्रमाण याबाबत आडाखे लावून शेती करायची पद्धत पारंपरिक होती. परंतु आता हवामानाचं चक्र इतकं अनियमित झालं आहे की, शेतकऱ्याला तांत्रिक आणि वैज्ञानिक आधाराशिवाय निर्णय घेणं धोकादायक ठरू शकतं. पावसाची सुरुवात झाली म्हणून पेरणी केली, पण दोन आठवडे कोरडी हवा राहिली, तर अंकुरित झालेली बियाणं वाया जातात. उशिरा पडणाऱ्या पावसामुळे काढणीची पिकं खराब होतात. त्यातून होणारे आर्थिक नुकसान केवळ शेतकऱ्याचं नाही, तर संपूर्ण अन्न-साखळीचं संकट ठरू शकतं.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी हवामान साक्षरतेकडे गांभीर्याने पाहणं अत्यंत गरजेचं आहे. याचा अर्थ, ‘कधी आणि कुठे किती पाऊस पडणार आहे’, याच्या अंदाजांबरोबरच ‘या पावसामुळे माझ्या पिकांवर काय परिणाम होईल?’, ‘कशाप्रकारे मी नियोजन करू शकतो?’, ‘काही पर्यायी पीक घ्यावं का?’, ‘मातीचा ओलावा किती आहे?’, ‘जमिनीत बदलत्या तापमानाचा परिणाम कोणत्या टप्प्यावर होतो?’ यासारख्या प्रश्नांची उत्तरं शोधता येणं हीच खरी हवामान साक्षरता. भारतात सध्या हवामानविषयक माहिती देणारी अनेक प्रणाली अस्तित्वात आहेत. भारतीय हवामान विभाग (IMD), कृषी विज्ञान केंद्रं (KVKs), विविध मोबाइल ॲप्स, राज्य सरकारच्या ‘कृषी सल्ला’ प्रणाली, विद्यापीठांचं कृषीदर्शन, तसेच खाजगी कंपन्यांची विश्लेषणं हे सर्व शेतकऱ्यांना माहिती मिळवण्यासाठी उपयोगी ठरतात. पण प्रश्न असा आहे की, ही माहिती प्रत्यक्ष शेतकरी वापरतो का? तिचा अर्थ समजतो का? आणि त्या आधारे तो निर्णय घेतो का? अनेक वेळा ही माहिती शास्त्रीय भाषेत असते, वेळेवर पोचत नाही, किंवा संदर्भाशिवाय असते. त्यामुळे हवामान साक्षरता ही केवळ माहिती पोहोचवण्याची गोष्ट नसून, माहितीचा अर्थ लावण्याची क्षमता निर्माण करणं ही खरी गरज आहे. या क्षमतेच्या अभावामुळे कित्येक वेळा शेतकऱ्यांनी चुकीचं नियोजन केलं, अनाठायी फवारणी केली, कीडरहित पिकावर रसायनं फवारली, अथवा पाण्याचा चुकीचा अंदाज घेतला. याचा थेट परिणाम उत्पादनावर आणि खर्चावर झाला.

हवामान बदलाचं शास्त्र हे केवळ प्रयोगशाळेपुरतं मर्यादित न ठेवता, ते शेतकऱ्याच्या शेतात नेणं आणि त्यांच्या अनुभवांना विज्ञानाशी जोडणं हाच पुढील दिशेचा पाया आहे. हवामान साक्षरतेसाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिलं पाहिजे, ग्रामपातळीवर हवामान निरीक्षण केंद्रं उभी केली पाहिजेत, स्थानिक बोलीभाषेत माहिती दिली पाहिजे, आणि त्यावर आधारित ‘काय करावं आणि काय टाळावं’ याचं मार्गदर्शन मिळालं पाहिजे. आज आपण बघतो की हवामान बदलांमुळे कृषी संकट वाढलं आहे. कोरडवाहू भागात पावसाचं प्रमाण कमी झालं आहे, काही भागात अतिवृष्टी झाली आहे, उन्हाळ्यातही गारपीट होत आहे. ज्या भागात एकेकाळी साखर ऊस भरभरून यायचा, तिथे आता पाण्याचा ताण आहे. काही भागांत उष्णतेमुळे परागीकरणाच्या प्रक्रियेत अडथळा येतोय. या साऱ्या बदलांचा थेट संबंध हवामान साक्षरतेशी आहे. शेतकरी जर हवामान समजून घेतला, तर तो या बदलांना सामोरा जाण्यास अधिक सक्षम ठरतो.

पिकांचे जीवनचक्र हवामानाशी निगडित असते. उगम, वाढ, फुलोरा, फळधारण, काढणी या सर्व टप्प्यांवर विशिष्ट तापमान, आर्द्रता आणि प्रकाश आवश्यक असतो. हवामानात अनपेक्षित बदल झाल्यास पीक तणावात येतं. त्याचा परिणाम उत्पादनावर होतोच, पण काही वेळा रोगप्रवणता वाढते. उदा. अधिक आर्द्रतेमुळे बुरशीजन्य रोग जास्त होतात, कोरड्या हवेत अळीचं प्रमाण वाढतं. अशा परिस्थितीत हवामान साक्षरतेचा उपयोग होतो कारण यामुळे शेतकरी योग्यवेळी जैविक किंवा पर्यायी उपाय करू शकतो. शेतकऱ्यांना हवामान साक्षर करण्यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन कृषी अभ्यासक्रमात याचा समावेश करायला हवा. याशिवाय, कृषी विस्तार अधिकाऱ्यांनी नियमित हवामान साक्षरता शिबिरं घेणं, स्थानिक रेडिओ, Whatspp ग्रुप्स, मोबाईल ॲप्सचा वापर करून सल्ला देणं हे गरजेचं आहे. या साऱ्यासाठी धोरणात्मक पातळीवर प्रयत्न आवश्यक आहेत.

हवामान साक्षरता ही आता केवळ पर्यावरणाहवामान साक्षरतेपासून. चा भाग राहिलेली नाही. ती आर्थिक निर्णय, बीमाधोरणं, बियाण्यांची निवड, कृषी व्यवसाय आणि शाश्वततेशी जोडलेली आहे. हवामान साक्षर शेतकरी अनावश्यक खर्च टाळतो, योग्य पीक घेतो, पर्यायी उत्पन्नाच्या संधी शोधतो आणि संकटप्रसंगी कमी नुकसान सहन करतो. आपण आज यंत्र, ड्रोन, कृषी ॲप्स, सिंचन यंत्रणा यांच्याविषयी बोलतो; पण हे सगळं वापरण्यासाठी हवामान साक्षरता हवीच. केवळ कोणी फवारणी करतं म्हणून आपण करायचं, असं नको. आपल्या शेतात खरंच गरज आहे का? कीटकाचा प्रादुर्भाव वातावरणाशी संबंधित आहे का? अशा प्रश्नांची उत्तरे हवामान साक्षरता देऊ शकते.

आज हवामान बदल हे केवळ भविष्याचं संकट न राहता वर्तमानाचं वास्तव बनलं आहे. शाश्वत शेती, कमी निविष्ठा वापरणारी शेती, आणि हवामान-सहनशील पिकं हे यावर उपाय आहेत, पण या सगळ्यांच्या मुळाशी शेतकऱ्याची साक्षरता आहे ती म्हणजेच हवामान साक्षरता. शेवटी, हवामान साक्षरता म्हणजे केवळ थोडी अधिक माहिती नव्हे ती निर्णयक्षमतेची उंची आहे. अचूक हवामान वाचन, नियोजन आणि अंमलबजावणी केल्यासच शेतकरी बदलत्या हवामानाच्या लाटेवर आपली नाव सुरक्षितपणे चालवू शकतो. शेतीसाठी खतं, पाणी, बी-बियाणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच आता हवामानविषयीचं ज्ञान महत्त्वाचं झालं आहे. त्यामुळे आता काळजीची नाही, तर कृतीची वेळ आहे आणि ती कृती सुरू होते हवामान साक्षरतेपासून.

**-डॉ. भागवत चव्हाण,**
(लेखक कृषी वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# निपुण महाराष्ट्र योजना; खरंच विद्यार्थी निपुण होणार आहेत काय?

निपुण भारत....सन २०२० च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून निघालेलं पिल्लू. या पिल्लूची आज वाढ होतांना दिसत आहे आणि या पिल्लूची आवश्यकता वाटून त्या पिल्लूचा राज्यानंही स्विकार केलेला आहे. आता राज्यात निपूण महाराष्ट्र नावानं ते पिल्लू गाजत आहे.

निपुण महाराष्ट्र. ही एक परिक्षा पद्धती योजना आहे व या पद्धतीत विद्यार्थ्यांची चाचणी घेतली जात आहे. ज्या चाचणीत शंभर प्रतिशत योगदानच नाही तर शंभर प्रतिशत योग्य ठरणारी मुलं पाहून ती शाळा चांगली अर्थात निपुण आहे हे साध्य होणार आहे. त्याला बक्षीसही ठेवले आहे व ते बक्षीस जरा जास्तच आहे. त्याचं कारण आहे, ही परिक्षा पद्धत सर्वांनी राबवावी व त्यात वेळ घालवावा.

निपुण महाराष्ट्रची योजना चांगली आहे. ज्यानं विद्यार्थी समृद्ध होईल असे समजता येईल. ज्यातून विद्यार्थ्यांची कुवत दिसेल. परंतु खरंच ही परिक्षा पद्धत योग्य पद्धतीनं राबवली जात आहे काय? यावर उत्तर नाही असंच येतं. त्याचं कारण आहे, ही परिक्षा पद्धत राबवितांना येत असणाऱ्या अडचणी. तेव्हा या परिक्षा पद्धतीत नेमक्या कोणत्या अडचणी येतात, ते पाहणे गरजेचे आहे.

निपुण महाराष्ट्र अंतर्गत राबवत असलेली परिक्षा योजना. जी परिक्षा पद्धत राबवितांना दोन विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. पहिला विषय भाषा आणि दुसरा विषय गणित. भाषेत वाचन व लेखनावर भर दिलेला आहे व गणितात संख्याज्ञान व संख्येवरील क्रियेवर भर दिलेला आहे.

निपुण महाराष्ट्र अंतर्गत हा परिक्षा पद्धतीतील भाषेचा उपक्रम राबवत असतांना मुलांना वाचन क्षेत्रांतर्गत अक्षरओळख असणं गरजेचं आहे. त्यातच मुलांना अक्षरओळख असते. ते वाचन करतातही. परंतु नेट कव्हरेज बरोबर राहात नसल्यानं मोबाईल-मधील माईकद्वारे शब्द बरोबर उमटत नाहीत. काही ठिकाणी हीच परिस्थिती आहे.





शहरातील ही परिस्थिती. ग्रामीण भागात यापेक्षाही जास्त विपरीत परिस्थिती आहे. तिथं नेटचीच समस्या असून नेट कव्हरेज बरोबर राहात नसल्यानं विद्यार्थ्यांबाबत निपुण परिक्षा योजना राबवीत असतांना बराच वेळ लागतो. ज्यातून विद्यार्थ्यांना शिकवणं होत नाही. गोंधळ उडतो. निपुण परिक्षा योजनेत दुसरा अडथळा म्हणजे विद्यार्थी जरी चांगले वाचन करीत असले तरी त्यांच्या वाचन करण्याचे शब्द बरोबर उमटत नाहीत. तो वाचतो वेगळं व माईकला ऐकायला जातं वेगळं. ज्यातून शब्द बरोबर जरी वाचले असले तरी चुकतात. अशावेळेस निपुण महाराष्ट्र अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या परिक्षेचं मुल्यांकण बरोबर होत नाही. परिणामी यात अडथडे निर्माण होतात. परंतु ती शासनाची परिक्षा योजना असल्यानं त्यावर पर्याय काढला जातो. अशा पर्यायात हुशार विद्यार्थी की ज्यांना अस्खलितपणे वाचता येतं. ज्याचे स्पष्ट उच्चार आहेत. त्या विद्यार्थ्यांना वाचावयास लावलं जातं. याचाच अर्थ असा की ज्या विद्यार्थ्यांची परिक्षा घेत आहोत. त्याचं मुल्यांकण बरोबर होत नाही. काही ठिकाणी बेरीज वजाबाक्या शिक्षक स्वतः करुन त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अक्षरात लिहायला लावतात. ज्यातून विद्यार्थी निपुण ठरतात. प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच असते. याचाच अर्थ असा की जिथे विद्यार्थ्यांना चांगलं येतं. तिथे नेट कव्हरेज बरोबर नसल्यानं वा तांत्रिक अडचणीनं तेथील वास्तविक परिस्थिती मागे पडते व जिथे वास्तविकता पाळली जात नाही. त्या ठिकाणचं व्यवस्थित मुल्यांकण दिसतं. ही वास्तविकता आहे व ही वास्तविकता नाकारता येत नाही. त्यातच आजपर्यंत असेच उपक्रम आले की ज्यातून पळवाटा काढण्यात आल्यात. शाळेचा रेकॉर्ड मध्यम ठेवण्यात आला. शिवाय ही परिक्षा घेतांना घोकंपट्टीवर जोर देण्यात येतो. घोकंपट्टीत परिक्षा सुरु होण्याच्या आठदहा दिवस कसून सराव घेण्यात येतो. ज्यातून दिलेल्या तारखेवर तो विद्यार्थी आपले चांगले योगदान देवू शकेल. ज्यातून विद्यार्थ्यांची कल्पकता व विचार करण्याची योग्यता बाजूला पडते. ज्यातून विद्यार्थ्यातील संशोधन वृत्ती निष्प्रभ ठरते.

निपुण महाराष्ट्रच नाही तर भारत अंतर्गत ही परिक्षा योजना राबविण्यात येत असून या माध्यमातून सरकारला काय साकार करायचे आहे? ते कळायचा मार्ग दिसत नाही. तसा रास्त स्वरुपाचा उद्देशही दिसून येत नाही. उलट घेण्यात येत असलेल्या परिक्षेतील नियोजनानुसार वर्गात ही परिक्षा घ्यायला अनुचीत वेळ लागत असल्यानं सावळा गोंधळ उडत आहे व ही परिक्षा राबविणार असलेला घटक म्हणजे शिक्षक, या परिक्षेनं गोंधळून गेलेले आहेत.

विशेष म्हणजे नोकरीत असलेल्या संपुर्ण शिक्षकांची टि ई टी परिक्षा, निपुण चाचणी, श्वानाची जनगणना, या सर्व गोष्टीवरुन असं आढळून येत आहे की सरकारला मराठी शाळाच अजिबात बंद करायच्या आहेत. कॉन्व्हेंटच्या शाळा सुरु ठेवायच्या आहेत. त्याला कारण आहे, सरकारचे शिक्षकांना मिळणारे वेतन. ते वेतन जास्त असून त्यात सरकारचे पैसे जातात. ज्यातून सरकारच्या पैशाचा अपव्यय होतो, असं सरकारला वाटतं. महत्वपुर्ण बाब ही की निपुण चाचणी कशीही असो. ती सरकारची योजना असल्यानं ती राबवावीच. परंतु ती राबवीत असतांना त्यात दुय्यमपणा वा चालढकलपणा होवू नये. ती पारदर्शक व्हावी. त्यातच ती पारदर्शक करण्यासाठी एखादा तंत्रस्नेही शिक्षक शाळेत द्यावा. नेटची पुरेपूर शाळेत व्यवस्था असावी व विद्यार्थ्यांचे बोबडे बोल स्विकारण्याची निपुणने व्यवस्था करावी. जेणेकरुन सर्वच विद्यार्थी निपुण व्हावेत. निपुण ठरावेत. जेणेकरुन विद्यार्थी घडतील. असे जर झाले तर महाराष्ट्रच नाही तर देशही निपुण व्हायला वेळ लागणार नाही.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!



फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी रोजी आहे. दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारीपासून सुरू होत असून ती १८ मार्चपर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही १० फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो.

विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी-बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे.

नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परीक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी, बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही. त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# गुलमोहर



दिवसेंदिवस वाढत जाणारी गुलाबी थंडी अचानक कमी होत जाते.अगदी पहाटेच्या सुमारास लागणाऱ्या शेकोटीचं अस्तित्व तात्पुरत थांबतं. आणि कळत-नकळत उन्हाळ्याची चाहूल लागते.कालांतराने तीव्र उन्हाळ्याचे चटके जाणवायला लागतात. हळूहळू शेत-शिवाराच रूपांतर रिकाम्या ओसाड जमिनीत होतं.आसपासची आणि सगळीच झाडे आपली पानगळती सुरू करतात. शेत-शिवारात आणि रानात कुठेच हीरवळ दिसत नाही.आंब्याच्या झाडाला आलेला 'मोहर' पाहून आलेली दोन-चार पाखरे तेवढी दिसतात.आणि एका वेळी रानात झाडाला पानांऐवजी रिकाम्या फांद्या तेवढ्या उरतात.तेव्हा सगळीकडेच भकास उदास,बकाल,वाटायला लागतं.रखरख आणि रणरणत्या उन्हात दूरवरपर्यंत कोणीच दिसत नाही.

..पण दूरवर कुठेतरी आपलं एकट्याचं अस्तित्व घेऊन 'गुलमोहर' उभा असतो. तुझ्या-माझ्या प्रेमाची साक्ष म्हणून आठवतंय का तुला ,'गुलमोहर' आणि त्याच्या फुलांवर किती अंतकरणातून प्रेम असायचं तुझं. मी दिलेली गुलमोहराची फुलं अगदी कितीतरी महिने तू जपून ठेवायची 'जसाच्या-तशी' आणि म्हणायची जितकं माझं तुझ्यावर प्रेम आहे ना,अगदी तितकच प्रेम तू दिलेल्या फुलांवर आहे.

हालाकीच्या आणि गरिबीच्या परिस्थितीत तुला वेगळं काही देणं शक्य नसायचं,तेव्हा रानात जाऊन मी तुला हीच 'गुलमोराची' फुलं प्रेमाचं प्रतीक म्हणून तुझ्याा ओंजळीत टाकायचो. अगदी या क्षणात तुझे डोळे ओले व्हायचे, लग्नानंतर पण तू हीच फुल देणार ना...? हा तुझा कायम प्रश्न असायचा, नाही का..?त्यावेळी गरिबीच्या आणि हालाकीच्या परिस्थितीत तुला आपलं करता आलं नाही.तेव्हा तुझ्या वडिलांनी तुझ्यासाठी श्रीमंत घर आणि मुलगा बघून तुझं लग्न लावून दिलं, मोठ्या जड अंतकरणातून तू आपल्या बकाल गावाचा, माझा आणि 'गुलमोहराचा' निरोप घेतला.आणि आपण कायमसाठी दूर झालो. आता तुला 'गुलमोहर' आणि त्याची 'फुलं' आवडतात की नाही, हे मला माहित नाही.

बघ ना, आता या रखरख आणि रणरणत्या उन्हात 'गुलमोहर' अगदी फुलासह फुलला आहे. हीच गुलमोहराची फुलं तोडावीत तरी कुणासाठी ? आणि टाकावीत तरी कुणाच्या ओंजळीत? वर्षाकाठी एकदा का होईना, आपल्या या बकाल वस्त्याच्या ओसाड माळरानावर ही 'गुलमोहर' आणि त्याचे फुलं कायम फुलत राहतील तुझ्या माझ्या प्रेमाची साक्ष म्हणून....!!

**-कपिल घुगरे**
_ करंजी, उमरखेड, यवतमाळ
मो. ७०८३२११०२७

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

## लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करणारे वैविध्यपूर्ण प्रकार सादर

**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या सुचनेनुसार नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने येथील डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह येथे दुसऱ्या दिवशी विशेष सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी शाहीर प्रा. डॉ. शिवराज शिंदे प्रस्तुत शिवगौरव–लोककला पर्व कार्यक्रमात कीर्तन, गोंधळ, पोवाडा, शौर्यगीत, धनगरी लोकगीत, असा बहारदार अस्सल महाराष्ट्राच्या मातीतील लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करणाऱ्या लोककला प्रकाराने हा कार्यक्रम संपन्न झाला.



या सांस्कृतिक कार्यक्रमात इंजि. ह.भ.प. प्रवीण जाधव पिंपळदरीकर महाराज व त्यांच्या संचाने कीर्तन तर ऋषी माटालकर व त्यांचा संच यांनी पोवाडा सादर केला. संदीप गोंधळी व त्यांचा संचाने गोंधळ सादर केले. लोकगीतामध्ये धनगरी लोकगीत साजरे केले. शिवनेरीवर शिवबा जन्मला हे शौर्यगीत प्रशांत चित्ते यांनी सादर केले.

या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, तहसीलदार संजय वारकड यांच्यासह प्रशासनातील इतर अधिकारी, नागरिक, युवक–युवती, विद्यार्थी उपस्थित होते. विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष उत्साहाचे वातावरण लाभले. छत्रपती शिवाजी महाराजांचा शौर्य, आदर्श, स्वराज्य संकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे प्रभावी दर्शन घडविणारा हा कार्यक्रम आज सादर करण्यात आला. या कार्यक्रमास अधिकारी–कर्मचारी, नागरिक, मान्यवर तसेच विद्यार्थी व युवक–युवती यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# शस्त्र बाळगणारा गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** हातात तलवार, खंजीर असे घातक शस्त्र बाळगून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या एका गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकाने अटक केली. गुन्हेगाराकडून एक तलवार आणि दोन धारदार खंजीर जप्त केले आहेत.

शहर आणि जिल्ह्यात सराईत गुन्हेगारांच्या शोधात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांचे पथक गस्त घालत होते. अवैध व बेकायदेशीरपणे शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याचे वरिष्ठांचे आदेश होते. त्यानुसार या पथकाने इतवारा व देगलूर नाका भागात शोध घेतला. यावेळी पोलिसांना खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार आवेश ऊर्फ आवेश चड्डी सय्यद खलील (वय २६ रा. खुदबेनगर नांदेड) हा बेकायदेशीरपणे तलवार व खंजीर अशी धारदार व घातक शस्त्र बाळगून आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून एक तलवार व दोन खंजीर असा ३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देत त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# स्वारातीम विद्यापीठातील गणितीय शास्त्रे संकुलात आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठच्या गणितीय शास्त्रे संकुलाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय परिषद शैक्षणिक व संशोधनपर वातावरणात उत्साहात यशस्वीरीत्या संपन्न झाली.



परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी भूषविले. आपल्या उद्घाटनपर भाषणात त्यांनी गणितज्ज्ञांना आवाहन करताना सांगितले की, गणित केवळ सूत्रांपुरते मर्यादित न ठेवता ते सामान्य लोकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचविणे आवश्यक आहे. समाजजीवनात गणिताची उपयुक्तता वाढविण्यासाठी सखोल संशोधन होणे गरजेचे असून विद्यार्थ्यांनी या ज्ञानाच्या आधारे स्टार्टअप्स सुरू करून प्रादेशिक विकासात योगदान द्यावे, ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी प्रभारी कुलसचिव तथा गणितीय शास्त्रे संकुल संचालक डॉ. डी. डी. पवार व त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले.

प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी ही परिषद शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल व नवसंशोधकांच्या संकल्पनांना चालना देईल, असे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी प्रा. प्रद्युम्न कुमार साहू यांनी सापेक्षतावाद, गुरुत्वीय तरंग, कृष्णविवर आणि ब्रह्मांड विस्तार या विषयांचे महत्त्व अधोरेखित करत संशोधकांना उच्च दर्जाच्या संशोधनासाठी प्रेरित केले.

विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा भाऊराव चव्हाण साखर कारखान्याचे संचालक श्री. नरेंद्रदादा चव्हाण यांनी कृषी व औद्योगिक क्षेत्रात गणिताची भूमिका स्पष्ट करत स्टार्टअपच्या दृष्टीने त्याचा उपयोग करण्याबाबत चर्चा होण्याची आवश्यकता व्यक्त केली. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, आय.आय.एल. संचालक डॉ. शिलेश वढेर आणि आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. डी. डी. पवार यांनी प्रास्ताविकात परिषदेची उद्दिष्टे स्पष्ट केली. याच प्रसंगी कुलगुरूंच्या हस्ते *'डिजिटल संशोधन निबंध प्रकाशन पुस्तिका'*चे अनावरण करण्यात आले.

या परिषदेत देश–विदेशातील तज्ज्ञांनी ऑनलाइन व ऑफलाईन सहभाग नोंदविला. दक्षिण आफ्रिका, माल्टा, तुर्की, रशिया तसेच आयआयटी पाटणा येथील तज्ज्ञांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले; तर बीआयटीएस पिलानी, मणिपूर, ओडिशा, शिवमोग्गा, पुणे, कर्नाटक, नवी दिल्ली, डीआयएटी पुणे आणि सोलापूर येथील मान्यवर तज्ज्ञ प्रत्यक्ष उपस्थित राहिले.

परिषदेत २६० हून अधिक संशोधक व विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला असून १७० हून अधिक शोधनिबंध सादर करण्यात आले.

# युनिव्हर्सल स्कूलमध्ये मिरवणुकीने शिवजयंती साजरी; विद्यार्थी बनले मावळे

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी माता जिजाऊ, मावळे आणि शिवकालीन वीर यांच्या वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त करून दिले.

कार्यक्रमाची सुरुवात एका मिरवणुकीने झाली. शिवाजी महाराजांच्या वेशातील विद्यार्थी घोड्यावर आरूढ होता, तर मिरवणुकीच्या अग्रभागी ढोल–ताशे, लेझीम आणि तुतारीच्या गजराने संपूर्ण वातावरण शिवमय झाले. जय भवानी, जय शिवाजी, या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण कॅम्पस दुमदुमून गेला.

हायस्कूल विभागातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक प्रभावी नाट्यप्रयोग सादर केला. या नाट्यप्रयोगातून विद्यार्थ्यांना शिवचरित्रातील पराक्रम, शौर्य, नेतृत्वगुण आणि स्वराज्याची प्रेरणा यांचा जिवंत अनुभव मिळाला.



मुख्याध्यापिका ज्योतकौर पहाडिया आणि शिक्षकवर्ग यांनी या कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन केले होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे ही शिवजयंती विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभूती ठरली.

# जि. प. शाळा नानू नाईक तांडा येथे संत सेवालाल जयंती साजरी

**उमरी (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नानू नाईक तांडा (ता. उमरी) येथे 'माझी शाळा, माझा अभिमान' या उपक्रमांतर्गत संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे शाळेच्या हाकेला साद देत गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन हा सोहळा स्वखर्चाने आयोजित केला होता, ज्यामुळे शाळेत आणि गावात चैतन्य निर्माण झाले होते.



शाळेतील शिक्षकांनी मांडलेल्या विचाराला गावकऱ्यांनी भरभरून पाठिंबा दिला. या कार्यक्रमात वसंतनगर, रामनगर आणि सीतानगर या तिन्ही तांड्यांवरील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावातून प्रथमच मिरवणूक काढण्यात आली. यावेळी तांड्यावरील महिलांनी पारंपरिक बंजारा वेशभूषा परिधान करून केलेले नृत्य मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले.

नानुनाईक तांडा, सीतानगर, रामनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आजपर्यंतच्या इतिहासात नानुनाईक तांडा येथील शिक्षकांच्या प्रयत्नातून पहिल्यांदा संत सेवालाल जयंतीचा कार्यक्रम पार पडला. तसेच शाळेत शिक्षकांकडून चालू शैक्षणिक वर्षात राबवीत असलेल्या उपक्रमाचे गावकऱ्यांकडून कौतुक केले जात आहे

**विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाची धूम**

मिरवणुकीदरम्यान जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांनी लेझीमची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. लेझीमच्या तालावर थिरकणाऱ्या विद्यार्थ्यांचे कसब पाहून गावकऱ्यांनी त्यांना दाद दिली. ग्रामस्थांनी या बालकलाकारांचे कौतुक करत त्यांना रोख बक्षिसे देऊन प्रोत्साहित केले.

# वाई बाजार गावात जाणारी बससेवा पूर्ववत सुरु करण्याची मागणी

**माहूर (प्रतिनिधी) –** माहूर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ व किनवट–माहूर या राष्ट्रीय महार्गावरील वाई बाजार फाट्यावरून गावात एकेकाळी सुरु होती. ही बससेवा रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मागील अनेक वर्षांपासून खंडित झाली. त्यामुळे वाई बाजार गावात ये–जा करणाऱ्या दैनंदिन प्रवाशांना फाट्यावरून गावापर्यंत पायपीट करावी लागत असल्याची बाब लक्षात घेता शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते पिंटू पाटील वायफनीकर यांनी तात्काळ विभागीय वाहतूक नियंत्रक नांदेड यांना लेखी निवेदन दिले. माहूर किनवट या राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या सर्व बसेस वाई बाजार गावालगत सुरु करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे.

वाई बाजार गावाला जोडणारी बससेवा मागील एक वर्षांपासून बंद असल्यामुळे दैनंदिन प्रवासी, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनींना जवळपास एक कि. मी. अंतर दररोज पायी जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. त्याबरोबरच फाट्यापासून गावाला जोडणारा रस्ताही मागील महिन्याभरापूर्वीच नव्याने काम झाल्याने फाट्यापासून गावात येणारी बससेवा पूर्ववत सुरु करण्याचा मार्गही मोकळा झाला असल्याचे वायफनकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

# के. सी. भुसारी यांचे निधन

**किनवट (प्रतिनिधी)–** तेलंगणाच्या म्हैसा जि. निर्मल येथील मूळ रहिवाशी तथा हैदराबादच्या रिझर्व्ह बँकेचे निवृत्त वरिष्ठ अधिकारी किशनराव चंद्रशेखरराव भुसारी (वय ९२) यांचे गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी हैदराबाद येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



कै. भुसारी यांच्या पत्नी प्रभावती भुसारी यांचे गेल्यावर्षी १९ फेब्रुवारी रोजीच निधन झाले होते. के. सी. भुसारी यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी १० वाजता हैदराबाद येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पुणे येथील राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राचे वरिष्ठ संचालक राजेश दि. भुसारी यांचे ते चुलते होत.

# महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांनी घेतली स्वच्छता विभागाची आढावा बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि आगामी पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी स्वच्छता विभागाची महत्त्वाची आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना सूचना दिल्या.

या बैठकीत प्रामुख्याने जयंती उत्सव आणि रमजान दरम्यान शहरातील मुख्य रस्ते, चौक, आणि विशेषतः धार्मिक स्थळांच्या परिसरातील स्वच्छता अधिक वेगाने करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्तांनी दिले आहेत. जयंतीचा मिरवणूक मार्ग आणि मशिदींच्या परिसरातील कचरा नियमितपणे उचलण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात येणार असल्याचे यावेळी स्वच्छता विभागाचे उपायुक्त नितीन गाढवे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे सण–उत्सवाच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक प्रभागामध्ये सर्व स्वच्छता निरीक्षकांनी दक्ष राहुन स्वच्छतेचे काम प्राधाण्याने करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

अतिरिक्त आयुक्तांनी स्पष्ट केले की, शहराचे सौंदर्य राखणे आणि सण शांततेत व स्वच्छ वातावरणात पार पाडणे ही महानगरपालिकेची प्राथमिकता आहे. यासाठी त्यांनी सर्व स्वच्छता निरीक्षकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात सतर्क राहण्याचे आणि नियमित देखरेख करण्याचे आदेश दिले. या बैठकीस उपायुक्त नितीन गाढवे, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादेक, मुख्य स्वच्छता निरीक्षक वसीम तडवी, सर्व स्वच्छता निरीक्षक व शहर स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या अमृत कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

# लोहगाव येथे शिवजयंती उत्साहात; ५३ जणांचे रक्तदान



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** येथून जवळच असलेल्या लोहगाव येथे बहुजनांचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवजयंतीचे औचित्य साधत गावकऱ्यांच्या पुढाकारातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ५३ युवकांनी स्वयंस्फुर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शिवरायांचा आदर्श केवळ जयंती साजरा करण्यापुरता नसून तो कृतीतून जपला पाहिजे, असा संदेश यावेळी मान्यवरांनी दिला. रक्तदाना–सारख्या पवित्र कार्यातून शिवजयंती साजरी करणे हीच खरी शिवभक्ती असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष मोरे, डॉ. आसमा शेख (वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र लोहगाव), नांदेड येथील गोळवळकर गुरूजी रक्तपेढीचे उदय राऊत, अपेक्षा जैस्वाल आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांना डॉ. संतोष मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

रक्तदान शिबिरास गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत समाजाप्रती आपली जबाबदारी अधोरेखित केली. शिवजयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी शंकर चौधरी, मालिकार्जून वानोळे, सूर्यकांत वानोळे, प्रशांत वानोळे, राहुल कांबळे, साईनाथ ताटेवाढ, अनिल देशमुख, नामदेव मुर्शेतवाड, राम उंबरे, विशाल शिरसागर, राजू लष्करे, प्रल्हाद वानोळे, अंकुश देशमुख, दीपक अनंतवाड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# गंजगाव ग्रामपंचायतीकडून प्रवासी बस सुरू करण्याची मागणी

**बिलोली (प्रतिनिधी)–** गंजगाव ग्रामपंचायतीने गावातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी लक्षात घेऊन सार्वजनिक प्रवासी बस सुरू करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एस. टी.) यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत कार्यालय, गंजगाव येथून पाठविण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गंजगाव हे गाव तालुका व जिल्हा मुख्यालयापासून दूर अंतरावर तेलंगाना सीमा भागात असूनही येथे नियमित एस. टी. बससेवा उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना बाजारपेठेत जाण्यासाठी, तसेच सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी आणि आरोग्यसेवेसाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

गंगाजाव हे गाव कुंडलवाडी मार्गावर वसलेले असून, परिसरातील अनेक गावे या मार्गावर अवलंबून आहेत. मात्र, बससेवा नसल्यामुळे नागरिकांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी जास्त भाडे मोजावे लागते तसेच वेळेचीही मोठी नासाडी होते. विशेषतः शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वेळेवर पोहोचणे कठीण होते. अनेक वेळा विद्यार्थ्यांना उशीर होतो, शिक्षणावरही परिणाम होतो, असे निवेदनात म्हटले.

या निवेदनावर गंजगावच्या सरपंच सौ. सुनीता हणमंतराव कानशेटे यांच्या स्वाक्षरीचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे सांगण्यात आले. परिवहन महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक अनघा बारटक्के यांना लवकरच शिष्टमंडळ भेटणार असल्याचे सांगण्यात आले.

# मान्यवरांच्या उपस्थितीत रंगणार नरेंद्र-देवेंद्र महोत्सव

**नांदेड (प्रतिनिधी) –** नवामोंढा मैदान येथे दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भव्य नरेंद्र-देवेंद्र महोत्सवाची तयारी युद्धपातळीवर सुरू असून, कै. चंद्रभागा केरबा गंजेवार नगरी येथे सर्व व्यवस्था सुसज्ज करण्यात आली आहे. या दोन दिवसीय सांस्कृतिक सोहळ्यासाठी पालकमंत्री, खासदार, आमदार तसेच विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्यास संमती दिली असल्याची माहिती स्वागताध्यक्ष शिवप्रसाद राठी व संयोजक धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी दिली.

या महोत्सवाला नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. अजित गोपछडे, हळद संशोधन केंद्र अध्यक्ष हेमंत पाटील, भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, आमदार डॉ. तुषार राठोड (मुखेड), भीमराव केराम (किनवट), राजेश पवार (नायगाव), जितेश अंतापूरकर (देगलूर), बालाजीराव कल्याणकर (नांदेड उत्तर), आनंदराव बोंढारकर (नांदेड दक्षिण), बाबुराव कदम (हदगाव) यांच्यासह जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना काहली, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जत्थेदार संत बाबा बलविंदरसिंघ, भाजपा महानगराध्यक्ष अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह




रावत, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक सुरज गुरव, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दै. प्रजावाणीचे संपादक शंतनू डोईफोडे, कुबेर नगरीचे व्यवस्थापकीय संचालक सतीश शर्मा, भगवती हॉस्पिटलचे डॉ. अंकुश देवसरकर, भाजपा कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष सुरेश लोट, भाजपा दक्षिण विधानसभा प्रमुख डॉ. सचिन उमरेकर, प्रतिष्ठित व्यापारी अंबादास लालपोतू आदींचाही सहभाग राहणार आहे.

वेळेवर उपस्थित राहणाऱ्या रसिक, प्रेक्षकांसाठी भाजपा कामगार आघाडीच्या वतीने सुरेश लोट यांच्यातर्फे १० कलर टीव्हींचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

पहिल्या दिवशी चौदावा मराठी हास्य दरबार रंगणार असून, स्टँडअप कॉमेडीचे बादशहा बंडा जोशी, 'झी हास्य सम्राट'मधील लोकप्रिय कलाकार सिद्धार्थ खिल्लारे, शाहीर रमेश गिरी रसिकांचे मनोरंजन करतील. तसेच 'चला हवा येऊ दे' फेम सतीश कासेवार यांचा खास महिलांसाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात लालपोतू कलेक्शनतर्फे २५ पैठणी व ऑरगंज्या साड्या महिलांना मोफत देण्यात येणार आहेत.याच दिवशी रमेश पारसेवार, ड. गजानन पिंपरखेडे, रत्नाकर वाघमारे व गंगाप्रसाद तोष्णीवाल यांना नांदेड भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच सुधाकर पत्रभूषण पुरस्काराने पन्नालाल शर्मा, अभय कुळकजाईकर, चारुदत्त चौधरी, संतोष पांडागळे व रामेश्वर काकडे यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

दुसऱ्या दिवशी चोवीसावे अखिल भारतीय विराट कविसंमेलन होणार असून, मेरठ (उ.प्र.) येथील हास्य संचालक व क्रांती कवी सौरभ जैन सुमन, जबलपूर (म.प्र.) येथील हास्य गीतकार सुदीप भोला, भिलवाडा (राजस्थान) येथील व्यंग्य कवी दीपक पारेख, मैनपुरी (उ.प्र.) येथील वीररस कवी डॉ. मनोज चौहान, सुरत (गुजरात) येथील शृंगार रस कवयित्री सोनल जैन तसेच दिल्लीच्या वीर रस कवयित्री नेहा शर्मा 'नमन' यांचा सहभाग राहणार आहे. या दिवशी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना नांदेड भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

पान १ वरून...

**शिवरायांच्या विचारांचे अनुकरण...**

प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य केले, त्यांचे आम्ही ऋणी आहोत असे मत आपल्या प्रास्ताविकेत शिवजन्मोत्सव समिती चे अध्यक्ष कमलेश कदम यांनी व्यक्त केले.

आलेल्या सर्व मान्यवरांचे तसेच समाज बांधवाचे स्वागताध्यक्ष या नात्याने स्वागत करतो असे मत स्वागताध्यक्ष कल्पना चव्हाण व सुमेत्रा वडजकर यांनी मत व्यक्त केले. संचलन इजि.प्रविण जाधव यांनी केले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.जिजाऊ वंदना घेण्यात आली. मिरवणुकीतील ढोल ताशा व बँड पथक, महिला रैली तसेच जय जिजाऊ–जय शिवरायच्या गजराने परिसर दणाणून गेला होता. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवजन्मोत्सव समिती अध्यक्ष कमलेश कदम, जिजाऊ ब्रिगेड च्या जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष तथा शिवजन्मोत्सव समिती स्वागताध्यक्ष कल्पना चव्हाण जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष तथा स्वागताध्यक्ष सुमित्रा वडजकर, मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष सतीश जाधव,पि के कदम, नानाराव कल्याणकर, उद्धव सुर्यवंशी, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, परमेश्वर पाटील, भगवान कदम, डॉ.विद्या पाटील,अरुणा जाधव, वनिता देवसरकर, राणी दळवी,शिवाजी पाटील, हौसाजी गाढे, विक्रांत खेडकर, रमेश पवार, प्रल्हाद दुरपडे, ॲड. बालाजी वाघमारे, अंकुश कोल्हे, राधाकृष्ण होगे, दिलीप दळवी आदिंसह इतरांनी परीश्रम घेतले.

# युवा

## एन्गेजमेंट ते लग्न मधला काळ... 'गोल्डन पीरियड'

**तुमचं लग्न ठरलयं ? एन्गेजमेंट आणि लग्नामध्ये वेळ आहे का ? जर तुमचे उत्तर हो असेल तर हा तुमच्या आयुष्यातील सर्वात सुंदर काळ असेल. खरंतर एन्गेजमेंटपासून लग्नापर्यंतचा प्रवास खूप आनंददायी असतो. या काळात अनेक गोष्ट स्वप्नासारख्या असतात. या काळात तुम्ही तुमच्या जोडीदाराला खऱ्या अर्थाने ओळखू शकता. मात्र, हा काळही खूप कठीण आहे. कारण एकमेकांना डेट करण्याची ही वेळ अजिबात नाही. तुम्ही नवीन नात्यात प्रवेश करत असाल, पण तरीही तुमच्या लग्नाची तयारी या सर्व गोष्टींमध्ये खूप वेळ जातो. पण या काळीत तुम्हाला तुमच्या भावी आयुष्याच्या जोडीदारासोबत चांगले संबंध निर्माण करण्याच्या संधीही मिळू शकतात. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी...**



- इतर गोष्टींवर चर्चा करा : एंगेजमेंटनंतरचा बराचसा वेळ लग्नाच्या नियोजनात जातो. पण तुम्हाला तुमचं नातं घट्ट करायचं असेल तर लग्नाच्या दिवसाव्यतिरिक्त इतर काही गोष्टींवर चर्चा करा. तुम्ही तुमच्या हनिमून डेस्टिनेशनबद्दल चर्चा करू शकता. तुम्ही दोघेही अशा काही गोष्टी करू शकता, ज्यामुळे तुमचा तणाव कमी होतो. त्याच प्रमाणे तुम्ही एकमेकांना जास्त चांगल्या प्रकारे समजू शकता.
- भविष्यातील नियोजनाची चर्चा करा : प्रत्येकाचे अल्पकालीन किंवा दीर्घकालीन स्वप्न असते, जे त्याला लग्नापूर्वी किंवा नंतर पूर्ण करायचे असते. ही स्वप्ने तुमच्या जोडीदारासोबत शेअर करा. असे केल्याने, तुम्हा दोघांनाही तुमची स्वप्ने सोडावी लागणार नाहीत, परंतु तुम्ही एकमेकांच्या इच्छेचा आदर करून या ध्येयांकडे एकत्रितपणे पुढे जाऊ शकता. या काळात तुम्ही एकमेकांची मदत करु शकता.
- एकमेकांना चांगले जाणून घ्या : एंगेजमेंट नंतर तुम्ही तुमच्या जोडीदाराला चांगल्या प्रकारे जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एवढेच नाही तर या काळात तुम्ही मजबूत करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. कारण तुम्ही तुमचे उर्वरित आयुष्य या व्यक्तीसोबत घालवणार आहात. अशा परिस्थितीत तुमच्या आवडी निवडी या गोष्टींची चर्चा करा. त्यामुळे तुमचे नाते अजून घट्ट होण्यास मदत होईल.
- एकमेकांशी प्रामाणिक रहा : विवाह हा प्रामाणिकपणा आणि विश्वासाच्या पायावर असतो. तुमचे नाते अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी स्वतःशी प्रामाणिक असणे तितकेच महत्त्वाचे आहे. काहीवेळा लोक विचार न करता लग्न करतात. पण ते लक्षात येईपर्यंत खूप उशीर झालेला असतो. जर एखादी गोष्ट तुम्हाला त्रास देत असेल, तर ती तुमच्या जोडीदारासोबत शेअर करा. यामुळे तुमचे नाते अजून घट्ट होण्यास मदत होईल.
- वचनबद्ध राहा : लग्नाच्या एंगेजमेंट दरम्यान, तुमचा पार्टनर रिलेशनशिपसाठी बांधील आहे की नाही हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. लग्न हा खूप मोठा निर्णय आहे. हीच ती वेळ आहे जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराला दाखवू शकता की तुम्ही त्यांच्या आणि या नात्याप्रती किती प्रामाणिक आहात. जर तुमचा जोडीदार तुमच्यासाठी प्रामाणिक असेल तर तुमचे आयुष्य खूप सुंदर जगू शकता.
- कुटुंबातील सदस्यांना जाणून घ्या : जरी तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत जीवन जगण्याची कल्पना करत असाल. पण या सगळ्यात कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नका. सुखी वैवाहिक जीवनासाठी कुटुंबातील सदस्यांसोबत मजबूत बंधही आवश्यक आहे. तुमचा पार्टनर त्यांचे मन जिंकण्यासाठी काय करतो हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. तुमच्या जोडीदाराच्या कुटुंबाला चांगल्या प्रकारे जाणून घेण्यासाठी तुम्ही डिनरची योजना देखील करू शकता.

# सैल होणारी बेडी

**लग्न हे नक्कीच वाटतं तितकं सोप्पं नातं नाही आहे. एकाच व्यक्तीसोबत एकाच घरात आयुष्यभर सोबत राहण्याची ही कल्पना अगदी सुखावणारी वाटत असली तरी ती प्रत्येकालाच पचनी पडते असं नाही आणि म्हणूनच म्हणतात की लग्नाचा निर्णय हा कधीच घाईत घेऊ नये. नीट विचार करावा आणि आपण जेव्हा कोणत्याही संसारिक संकटासाठी तयार असू तेव्हाच या बेडीत अडकावे. अनेकजण खूप विचार करून व तयारीनिशी लग्न करतात आणि म्हणून त्यांची लग्न टिकतात तर अनेकजण विचार न करता घाई घाईत निर्णय घेतात आणि मग सगळाच खेळखंडोबा होतो. लग्नानंतर नात्यात समस्या येणे ही मोठी गोष्ट नाही पण ती समस्या न सुटणे ही मोठी गोष्ट आहे. काहीजण या वर मार्ग काढतात तर काहींना काढता येत नाही आणि गोष्टी अधिक ताणल्या जातात. आज आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टी सांगणार आहोत ज्या संकेत देतात की हे नातं आता संपलं आहे. खाली दिलेल्या ५ गोष्टी दिसल्यानंतर बहुतेक कपल्सची संसार करण्याची इच्छाच संपते, ते आशा सोडून देतात. तुमच्याही नात्यात ही स्टेज आली नाही ना.. ?**





- संवाद संपणे : संवाद हा नात्याचा एक महत्त्वाचा धागा असतो. कितीही काहीही झालं तरी संवाद संपला नाही पाहिजे. भले एकमेकांशी भांडा पण बोलणे टाकू नका. ज्या कपल्समध्ये बोलणेच होत नाही त्यांचे हळूहळू एकमेकांबद्दलचे मत बदलत जाते. हळूहळू दोघेही नात्याबद्दलच्या अपेक्षा सोडून देतात. प्रयत्न करणे सोडून देतात. अनेकदा अशावेळी इगो आड येतो. नेमका पुढाकार घ्यायचा कोणी हाच संभ्रम नाते कायमचे तोडून टाकतो. त्यामुळे संवाद संपला की समजून जावं हे नातं संपलं आहे.
- ओढ संपणे : आपल्या समाजात नेहमी एक गोष्ट बिंबवली जाते की, शारीरिक प्रेमापेक्षा मानसिक प्रेम हे महत्त्वाचे आहे पण असे नसते. दोन्हींचा समतोल राखता आला पाहिजे. ज्या नात्यात शारीरिक जवळीक नसेल, शारीरिक सुख नसेल ते नाते मुळातच नाते म्हणता येणार नाही. कारण ओढ तेव्हाच निर्माण होते जेव्हा एकमेकांकडून सुख मिळते. अनेकदा बऱ्याच कारणांमुळे कुठेतरी या जवळकीमध्ये खंड पडतो आणि मग हळूहळू हा खंड मोठा होऊ लागतो व एक वेळ अशी येते की दुसऱ्या कोणाच्या तरी सहवासाची गरज भासू लागते. ही स्थिती सुद्धा दर्शवते की नाते संपलेले आहे.
- वागणुकीतील बदल : वागणूक ही अशी गोष्ट आहे ज्यामधून व्यक्तीबाबत अनेक गोष्टी कळतात. एक हेल्दी रिलेशनशिप ती असते ज्यात पार्टनर्स रोज एकमेकांसोबत हसून खेळून बोलतात, ऑफिसला जाताना एकमेकांना गुड बाय करतात. एकमेकांची दिवसभर विचारपूस करतात, काळजी घेतात. पण जेव्हा या सगळ्या गोष्टी बंद होतात आणि दोन अनोळखी लोकं एकमेकांसोबत राहत आहेत. त्याप्रमाणे राहू लागतात तेव्हा ती वागणूक दाखवून देते की नात्यामध्ये काहीच उरलेले नाही.
- अफेयर असणे : लग्नाचा जोडीदार असताना सुद्धा दुसऱ्या व्यक्तीबाबत आकर्षण निर्माण होणे किंवा दुसऱ्या व्यक्तीचा सहवास हवाहवासा वाटू लागणे म्हणजेच नात्यामध्ये रस नसणे होय. जेव्हा असे वाटू लागते आणि लग्नापेक्षा अफेअरला जास्त महत्त्व दिले जाते तेव्हा ते नाते कधीच ठीक होणार नसते. कोणीही कितीही प्रयत्न केला तरी ते दोन कपल्स पुन्हा एकत्र येण्याची शक्यताअगदीच शून्य असते.

### अजिबात न भांडणे

आपण बऱ्याचदा म्हणतो की ज्या नात्यात भांडणेच होत नाहीत ते नाते किती मस्त असेल. पण मंडळी असे अजिबात नसते. ज्या नात्यात भांडणे होत नाहीत ते नाते चांगले असेलच असेही नाही. स्वतः जाणकार सुद्धा सांगतात की ज्या नात्यात भांडणेच होत नसतील अशा कपल्समध्ये एकमेकांविषयी ओढच नसते. ते आपल्या पार्टनरला हवे ते करून देतात आणि याचाच अर्थ असा की त्यांना नात्याची काहीच काळजी राहिलेली नाही. त्यांनी नाते सोडून दिले आहे. त्यामुळे लक्षात घ्या की थोडे तरी भांड्याला भांडे लागले पाहिजे. यातून एकमेकांविषयीचे प्रेम अधिक वाढते.

# Breakup झालंय?

## या गंभीर आजारांशी होऊ शकतो सामना !

**ब्रेकअप होणं ही खूपच वेदनादायी गोष्ट आहे. ब्रेकअपमधून बाहेर पडणे प्रत्येकासाठी सोपे नसते. जेव्हा तुम्ही ब्रेकअपमधुन जात असता तेव्हा अनेक गोष्टी तुमच्या डोक्यामध्ये असतात. जेव्हा तुमचे खरे प्रेम तुमचा वाईट पद्धतीने विश्वासघात करते आणि तुमच्याशी सर्व संबंध तोडते तेव्हा खूप वेदना होतात. आयुष्यात काही करु नये असं त्यांना वाटत असतं. पण तुम्हाला माहित आहे का की ब्रेकअपचा परिणाम तुमच्या मनासोबतच तुमच्या शरीराला देखील होतो. कधी कधी ही परिस्थिती इतकी भयंकर बनते की लोक पूर्णपणे उद्ध्वस्त होतात. जेव्हा आपण दुःखी असतो तेव्हा आपण स्वतःला त्रास करुन घेतो. याकाळात आपला योग्य आहार घेत नाही. त्यामुळे त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. तसेच असेच चालू राहिले तर आपल्याला अनेक आजार देखील होऊ शकतात. ब्रेकअप केवळ त्याच्या मनच नाही तर माणसाचे शरीर पूर्णपणे पोकळ बनवते. हे तुम्हाला वाचायला थोडं विचित्र वाटेल, पण या परिस्थितीतून जाणारा माणूसच जाणतो की, हृदयविकाराच्या वेदनांसोबतच इतर किती समस्यांना तोंड द्यावं लागतं. या काळात आपण स्वतःची जास्त काळजी घेणं गरजेचं असतं चला तर मग जाणून घेऊयात तुम्हाला कोणते आजार होऊ शकतात.**



- छातीत वेदना होणं : जेव्हा कोणी आपले मन मोडते तेव्हा त्याचा परिणाम आपल्या छातीवर होतो. त्यामुळे आपल्या छातीत विचित्र वेदना होतात. या काळात आपला मेंदू अनेक भावनिक गोष्टीमधून जात असतो त्यामुळे आपल्याला या वेदना जाणवतात.वेदना दिसू शकत नाहीत परंतु त्याचा शरीरावर वाईट परिणाम होतो. कधीकधी या वेदनामुळे माणूस खूप आजारी पडतो. छातीतील वेदना फार काळ राहिल्या तर त्याचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम करु शकतात.
- हृदयविकाराचा झटका : एका संशोधनानुसार, ब्रेकअपनंतर हृदयात अशांतता निर्माण होऊ शकते असे समोर आले आहे. तुमच्या हृदयाची काळजी घेणं महत्त्वाचं आहे. जेव्हा मनात अनेक विचार असतात त्याचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. ताण तुमच्या शरीरावर परिणाम करू शकतो. अशा गोष्टींमध्ये स्वतःला व्यस्त ठेवणे हा एकमेव उद्देश तुमच्या समोर असायला हवा. यासाठी स्वतःला अशा गोष्टींमध्ये व्यस्त करुन ठेवा ज्यामध्ये तुमचे लक्ष विचलित होणार नाही.
- मानसिक तणाव : मानसिक तणाव तुम्हाला अनेक प्रकारे आजारी बनवू शकतो. कारण जेव्हा तुम्ही हार्ट ब्रेकमधून जातो तेव्हा तुमचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते. यामुळे वजनामध्ये वाढ होणं मासिकपाळी चुकणे PCOD यांसारख्या समस्या येतात. यासाठी थोडसं चालणं व्यायाम करणं आणि गरम पाणी पिणे यांसारख्या गोष्टी करा. त्यामुळे तुम्हाला फायदा होईल.
- प्रतिकारशक्ती कमी होते : ज्याच्याकडून आम्हाला खूप आशा आहेत, जर अशा व्यक्तीने तुमचा विश्वासघात केला तर त्याचा परिणाम तुमच्या प्रतिकारशक्तीवर होतो. एका अभ्यासानुसार, ब्रेकअपनंतर प्रतिकारशक्ती कमी होते, ज्यामुळे तुम्ही आजारी पडतात. अशा परिस्थितीत भरपूर पाणी प्यावे, असा सल्ला तज्ञ देतात.
- केस गळतात : तणावामुळे केस गळतात हे तुम्ही ऐकलेच असेल. हे खरं आहे. ब्रेकअप किंवा हार्टब्रेक झाल्यानंतर तणावामुळे केस गळणे ही सामान्य गोष्ट आहे. या तणावातून मुक्त होण्यासाठी तुम्ही नैसर्गिक मार्ग शोधणे चांगले. अशा स्थितीत लोक कशी वागतील या गोष्टीकडे लक्ष देऊ नका.

# स्लीप डिवोर्स चांगला पर्याय

**लग्न झाल्यावर रोज रात्री एकमेकांसोबत बेड शेअर करणे ही कपल्ससाठी सामान्य गोष्ट असली तरी एक खूप खास गोष्ट सुद्धा आहे. कारण हा तो वेळ असतो जो जोडप्याला खरा एकांत देतो. हा वेळ ज्या कपल्सना नीट वापरता येतो त्यांचे नाते अधिक घट्ट होते. पण ज्यांना या वेळेचे महत्त्व माहित नसते वा ते याकडे दुर्लक्ष करतात तेव्हा ते नाते खराब व्हायला जास्त वेळ लागत नाही. तुम्ही जर एक कपल म्हणून एकच बेड शेअर करत असाल उत्तम. पण जर तुम्ही एकाच घरात राहून वेगवेगळे झोपत साल तर ही एक गंभीर गोष्ट आहे. अर्थात असे वेगवेगळे झोपण्याला अनेक करणे देखील कारणीभूत असू शकतात. झोपताना जोडीदार जर मोठमोठ्याने घोरत असेल वा तुमच्या जोडीदाराला रोज लाईट लावूनच झोपायची सवय असेल तर अशावेळी अनेकदा कंटाळून कपल्स वेगवेगळे झोपणे पसंत करतात. जर अशी स्थिती निर्माण झाली तर त्याला Sleep Divorce म्हणतात का ? तर मंडळी होय, जेव्हा कपल्स स्वतंत्रपणे झोपतात तेव्हा त्याला स्लीप डिव्होर्स म्हणतात. असे केल्याने झोपेची समस्या दूर होते. शिवाय वाद न झाल्याने सकाळी उठल्यावर सुद्धा फ्रेश वाटते. पण असा प्रकार करणं कितपत योग्य आहे ? याविषयी तज्ञ काय म्हणतात ?**



- स्लीप डिव्होर्स म्हणजे काय? : स्लीप डिव्होर्स तेव्हा होतो जेव्हा कपल्स एकत्र राहतात पण चांगली झोप मिळावी म्हणून वेगळ्या बेडरूममध्ये झोपणे पसंत करतात. परिस्थितीनुसार, स्लीप डिव्होर्स दीर्घकालीन किंवा तात्पुरता असू शकतो. यामध्ये केवळ झोपायला मिळणे हा एकच कळीचा मुद्दा असतो आणि यच मुद्द्यावर कपल्स झोपताना वेगळे होतात. बाकी गोष्टींचा त्यांचा या स्लीप डिव्होर्सशी थेट संबंध नसतो. ही एक नवीन संकल्पना आहे जी आजच्या पिढीत झपाट्याने वाढताना पहायला मिळते आहे.
- स्लीप डिव्होर्स घेणे चांगले आहे का ? : आपल्याला खरोखर स्लीप डिव्होर्सची गरज आहे का ? तर त्याचे उत्तर आहे की कदाचित होय. आपल्या सर्वांना माहित आहे की निरोगी जीवनशैलीसाठी चांगली झोप खूप महत्वाची आहे. पण एका जोडीदाराच्या झोपण्याच्या काही सवयी दुसऱ्या जोडीदाराच्या झोपेला खराब करू शकतात. अशा परिस्थितीत जर तुमच्या जोडीदाराच्या झोपण्याच्या सवयींमुळे तुम्ही झोपेशी तडजोड करत असाल तर स्लीप डिव्होर्स विचार करणे चुकीचे नाही. कारण झोपच नीट मिळाली नाही तर हळूहळू त्याचा पूर्ण परिणाम तुमच्या एकूण आयुष्यावर होऊ लागतो.
- यामुळे नाते खराब होते का ? : स्लीप डिव्होर्सचा अर्थ असा नाही की तुमच्या नातेसंबंधावर परिणाम होईल. वेगवेगळे झोपणे ही कोणत्याही कपल्सची वैयक्तिक निवड आहे. एकमेकांवर मनापासून प्रेम करणाऱ्या दोन व्यक्ती याबाबतीत एकमेकांना नक्कीच समजून घेऊ शकतात. लक्षात ठेवा, झोपेच्या घटस्फोटाचा अर्थ असा नाही की तुम्ही एकाच पलंगावर एकत्र वेळ घालवू शकत नाही. जर तुम्हाला वाटले की आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराची गरज आहे तर तुम्ही त्याच्या सोबत बेड शेअर करू शकता. एक दिवस त्याचा त्रास सहन करू शकता. पण जेव्हा तुम्हाला शांत झोप हवी असले तेव्हा स्लीप डिव्होर्स घेणे चांगले.
- स्लीप डिव्होर्स कसा घ्यावा : आपल्या जोडीदाराला स्लीप डिव्होर्स घ्यायला तयार करणे हे नक्कीच सोप्पे नाही. ज्यांना माहित आहे ते ही गोष्ट लगेच समजून घेऊ शकतात, पण ज्यांना माहित नाही त्यांना ही संकल्पना समजावून सांगायलाच खूप वेळ जाऊ शकतो. जर तुम्ही दोघे एकमेकांना होणार त्रास समजून घेऊ शकलात तर स्लीप डिव्होर्स घेणे खूप सोप्पे आहे. शेवटी जरी यात डिव्होर्स हा शब्दसला तरी केवळ झोपण्यासाठी तुम्ही वेगळे होत असता, आयुष्यभरासाठी नाही. झोपेत तुम्हाला होणारा त्रास मनमोकळेपणाने तुम्ही जोडीदारापुढे बोलून दाखवा, जर तो समजूतदार असेल तर नक्कीच यावर विचार करेल.
- स्लीप डिव्होर्सचे फायदे काय आहेत ? : उत्तम झोप मिळावी म्हणून स्लीप डिव्होर्स खरंच खूप फायदेशीर आहे. यामुळे कपल्सना त्यांचा पर्सनल स्पेसही मिळतो. वेगळ्या बेडवर झोपल्याने चांगली झोप लागते. झोपेत अडथळा आणणारं तिथे कोणी नसतं. कपल्स एकमेकांसोबत न झोपताही जवळीक निर्माण करू शकतात. तर असे आहेत ह्या नव्याकोऱ्या स्लीप डिव्होर्स नामक संकल्पनेचे फायदे!

# विशीत चुकूनही नको या गोष्टी, अन्यथा लाइफचीच बर्बादीच !

**वयाच्या विशी ओलांडल्यावर मुलं स्वतःला खूपच मोठी समजतात. एवढे मोठे झाल्यावर स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण या काळात सर्वांकडून खूप मोठ्या चुका होतात. पण या चूका टाळता आल्या तर तुम्हाल त्याचा फायदा होतो. या चुकांचा तुमच्या आयुष्यावर खूप मोठा परिणाम होतो. त्यामुळे आयुष्यात या चुका करणे टाळा. 20 चे दशक विकसित आणि चुकांमधून धडे शिकणारे असते. या काळात होणाऱ्या चुका आपल्या आयुष्यावर खोलवर परिणाम करतात. या अल्लड वयात होणाऱ्या चुका तुम्हाला आयुष्यभर त्रास देऊ शकतात.**

- बचत न करणे : 20 व्या वर्षी स्वतःसाठी बचत न करणे ही मोठी चूक आहे. ही गोष्टी टाळले पाहिजे. तुमच्याकडे भरपूर पैसा असला तरी अवाजवी खर्च करू नका. पैसे वाचवायला शिका जेणेकरून तुम्ही चांगले जीवन जगू शकाल. जर तुम्ही बजेट न बनवता पैसे खर्च केले तर भविष्यात तुम्हाला यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते.
- सोशल मीडियावर सर्व काही : ही दुसरी मोठी चूक आहे , जी आजकालचे बहुतेक तरुण करतात. पार्टीला जाणे असो किंवा मित्रांसोबत हँग आउट असो, फोटो सोशल मीडियावर लगेच अपलोड होतात. तुम्ही एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेला असाल तर ते फोटोही तुम्ही लगेच फेसबुक-व्हॉट्सॲप आणि इन्स्टाग्रामवर टाकता.तुमच्या आयुष्याशी संबंधित क्षण सोशल मीडियावर शेअर केल्याने तुम्ही मित्रांमध्ये स्टार बनू शकता, परंतु या वयात दाखवणे टाळणे चांगले. ही वाईट सवय तुमच्या मानसिक आणि भावनिक स्थितीवर आणखी परिणाम करू शकते.
- व्यायाम करत नाही : वयाच्या 20 व्या वर्षी व्यायाम टाळणे खूप धोकादायक आहे. ही चूक बहुतेक तरुण करतात. एखाद्या व्यक्तीकडे पाहून तो तंदुरुस्त आहे असे वाटते. पण वयाबरोबर आरोग्याच्या समस्या त्यांच्यासमोर दिसू लागतात. हे टाळण्याचा उत्तम उपाय म्हणजे नियमित व्यायाम करून स्वतःला तंदुरुस्त ठेवणे.
- कम्फर्ट झोनमध्ये राहणे : 20 वर्षांचे वय ही प्रयोग करण्याची वेळ आहे. या वयात मुलांना कोणत्या दिशेने पाऊल टाकायचे आहे हे देखील कळू शकते. त्यामुळे तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडा. तुमच्या कम्फर्ट झोनमध्ये राहणे म्हणजे तुम्ही स्वतःला संधी मिळण्यापासून रोखत आहात.
- स्वतःला वेळ द्या : या काळात चिंता करणे थांबवा. तुम्ही स्वतःला वेळ द्या. तुमच्या मानसिक, शारीरिक आणि भावनिक स्थिरतेसाठी वर्षातून एक किंवा दोनदा कौटुंबिक सहलीला जा.

# किल्ले शिवनेरीवर रंगला शिवजन्माचा नयनरम्य सोहळा



**मुंबई(प्रतिनिधी)** – शिवजयंतीनिमित्त महाराष्ट्रासह देशभरातील विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुकीने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवजयंतीनिमित्त महाराष्ट्रासह देशभरातील विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुकीचं आयोजन करण्यात आलं आहे. शिवजयंतीनिमित्त किल्ले शिवनेरीवर आकर्षक अशी सजावट करण्यात आली आहे.

शिवजयंतीनिमित्त किल्ले शिवनेरीवर आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जन्मस्थळावर नतमस्तक होण्यासाठी राज्यातून अनेक शिवभक्त किल्ले शिवनेरीवर दाखल झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी हजेरी लावली.

या ठिकाणी बाळ शिवाजीचा पाळणा जोजवून या मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली आहे. त्यानंतर काही सांस्कृतिक कार्यक्रम आणि मर्दानी प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले आहेत.

या ठिकाणी बाळ शिवाजीचा पाळणा जोजवून या मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली आहे. त्यानंतर काही सांस्कृतिक कार्यक्रम आणि मर्दानी प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले. दरवर्षी शिवजयंतीनिमित्त किल्ले शिवनेरीवर अशा भव्यदिव्य सोहळ्याचं आयोजन केलं जातं. पाळणा जोजवला जातो. त्यानंतर साहसी खेळांचं प्रात्यक्षिक केलं जातं. दरवर्षी शिवजयंतीनिमित्त किल्ले शिवनेरीवर अशा भव्यदिव्य सोहळ्याचं आयोजन केलं जातं. पाळणा जोजवला जातो. त्यानंतर साहसी खेळांचं प्रात्यक्षिक केलं जातं. तसेच, किल्ले शिवनेरीवर संपूर्ण सोहळा व्यवस्थित पार पडण्यासाठी पोलिसांचा देखील कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

तसेच किल्ले शिवनेरीवर संपूर्ण सोहळा व्यवस्थित पार पडण्यासाठी पोलिसांचा देखील कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.







**गणेश को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेड.**

## जाहीर प्रगटन

गणेश को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नांदेडचे. मुळ प्लॉट व भागधारक सभासद कै. दिनकरराव गणपतराव इंगळे यांच्या नावे असलेला प्लॉट नं. ७१ ब ( २५द ७२ - १८०० चौ. फुट ) सर्व्हे नं. ६७/ वजिराबाद गणेशनगर, यांच्या वारसानी श्री प्रशांत दिनकरराव इंगळे यांनी केलेल्या विनंती अर्जा नुसार त्यांच्या वडीलाच्या नावे असलेला प्लॉट नं. ७१ ब सर्व्हे नं. ६७/ वजिराबाद गणेशनगर, नांदेड. हा स्वतःच्या( श्री प्रशांत दिनकरराव इंगळे) नावे वारसाहक्काने हस्तांतरण करण्यासाठी केलेल्या अर्जावर संस्था येणा-या संचालक मंडळाच्या सभेत निर्णय घेणार आहे. प्लॉट नं. ७१ ब सव्र्हे नं.६७/ वजिराबाद गणेशनगर, नांदेड. (ज्याची लांबी ३६ फुट द रुंदी ५० फुट एकुण क्षेत्रफळ १८०० चौ. फुट आहे.) ज्याची चतु:सिमा :- पुर्वेस :- प्लॉट नं. ८२, पश्चिमेस :- प्लॉट नं. ७१अ, दक्षिणेस:- सार्वजनिक रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ७२, या चतु:सिमेतील प्लॉट नं. ७१ ब सव्र्हे नं. ६७ / वजिराबाद गणेशनगर, नांदेड. हा वरील व्यक्तीच्या नावे हस्तांतरण करण्यात येणार आहे.

तरी वरील हस्तांतरण व दर्शविलेल्या जाहिर प्रगटनाबाबत संबंधीत अर्जदाराचे नातेवाईक, इतर वारसदार व हितसंबंधी (बँक, वित्तपुरवठा करणा-या संस्था, इतर कोणास) कांही आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाच्या आत पुराव्यासह आक्षेप संस्थेच्या कार्यालयात सादर करावा. अन्यतः त्यानंतर आलेले कुठलेही आक्षेप किंवा उजर आल्यास ग्राह्यधरल्या जाणार नाही. सदरील अर्ज मंजुर करून अर्जदाराने केलेल्या विनंती अर्जानुसार प्लॉट हस्तांतर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

जाहीर प्रगटन देणार

सचिव — यशवंत देशमुख किल्लेवडगावकर | अध्यक्ष — विजय गंभीरे

गणेश को-आप हॉऊसिंग सोसायटी लि. गणेशनगर, नादेड


# आरटीई अंतर्गत ऑनलाईन प्रवेशास सुरुवात; आर्थिक, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शाळेत मोफत प्रवेश

**मुंबई(प्रतिनिधी)** – देशातील शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार मिळाला आहे. त्यामुळे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्येही गरीब कुटुंबातील आणि वंचित घटकातील बालकांना मोफत प्रवेश मिळण्यासाठीच्या प्रक्रियेला यंदाच्यावर्षी सुरुवात झाली आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम ंतर्गत (आरटीई) दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. बालकांच्या पालकांना यासाठी संबंधित अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ही प्रक्रिया राबविण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या असल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी दिली आहे.

आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा/विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. वंचित घटकांतील बालकांमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड) इतर मागासवर्ग (ओबीसी), विशेष मागासवर्ग (एसबीसी), आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित बालक, अनाथ बालके, दिव्यांग बालके अथवा कोविड प्रभावित बालकांचा समावेश होतो. तर, आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे अशा बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. बालकांच्या पालकांना त्यांच्या निवासस्थाच्या ठिकाणापासून एक किमी पेक्षा कमी अंतरावरील शाळा (हवाई अंतर) आरटीई पोर्टलवर दिसतील. या अनुषंगाने प्रक्रियेकरिता विचारपूर्वक १० शाळांची निवड करण्यात यावी आदी सूचना शिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आल्या आहेत.


कार्यालय

## जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड

संचिका क्र. ६९/४९/२०२६ नांदेड — क्र.जि.व.अ-चौकशी-१/४०/२०२६

दिनांक-१९/जानेवारी/२०२६

## जाहीर प्रगटन

**उम्मदी अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणे बाबत.**

**वक्फ संस्थेचे नाव-मस्जिद नवरंगपुरा आणि कब्रस्तान (टाकीच्या काठावर) पत्ता- मानसपूर कंधार ता. कंधार, जि. नांदेड**

**उपरोक्त वक्त संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास नोंदणीकृत असून, अर्जदार अल्लाउद्दीन सुलतान शेख व इतर (४) लोकांनी दि. २४/१२/२०२५ प्रमाणे सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ (५) वर्षांचा असून, व्यवस्थापन समिती निवडीची रिक्त निवडणुकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | अल्लाउद्दीन सुलतान शेख | अध्यक्ष |
| २. | सय्यद खाजा सय्यद उस्मान | उपाध्यक्ष |
| ३. | शेख जावेद शेख इमाम | सचिव |
| ४. | शेख शादुल शेख मुनीर | सहसचिव |
| ५. | शेख मेहराज मकदुम शेख | कोषाध्यक्ष |
| ६. | सय्यद समद सय्यद शादुल | सदस्य |
| ७. | शेख जुनेद शेख मुर्तुजा | सदस्य |
| ८. | शेख जुबर शेख शेरू | सदस्य |
| ९. | शेख मझर शेख महेबुब | सदस्य |

**सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांना सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय नांदेड, पत्ता- मस्जिद जुनी इदगाह नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे विहित वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.**

**मो. मोतासिम अन्सारी**
**जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड**



## जाहीर प्रगटन

**प्रियदर्शनी शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.नांदेड, ता.जि.नांदेड**

या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणूक सन २०२६ ते २०३१ करीता निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात येत असून उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करण्याचा कालावधी- दि.२०/०२/२०२६ ते २६/०२/२०२६ असा आहे. तसेच प्राप्त उमेदवारी अर्जाची छाननी- दि.२७/०२/२०२६, वैध नामनिर्देशपत्रांची यादी प्रसिध्दी- दि.०२/०३/२०२६, उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दि.१६/०३/२०२६ व मतदान दि. २९/०३/२०२६ अशा महत्वाच्या तारखा आहेत. सविस्तर निवडणूक कार्यक्रम संस्थेचे कार्यालय व मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.नांदेड यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

दिनांक : २०/०२/२०२६
ठिकाण : नांदेड

(एस.एल. कार्लेकर)
निवडणूक निर्णय अधिकारी
प्रियदर्शनी शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था
मर्या.नांदेड, ता.जि. नांदेड
(मो.नं. ९८२२८३८८६३)


# सेन्सेक्स १२०० अंकांनी कोसळला; निफ्टीत देखील घसरण, गुंतवणूकदारांचं नुकसान



**मुंबई(प्रतिनिधी)**– भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली आहे. सेन्सेक्स १२३६ अंकांनी कोसळला तर, निफ्टीमध्ये देखील घसरण झाली. भारतीय शेअर बाजारात गुरुवारी झालेल्या घसरणीमुळं बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४७२ लाख कोटींवरुन ८ लाख कोटी रुपयांनी घसरून ४६४ लाख कोटींवर आलं आहे.

भारतीय शेअर बाजारात जोरदार विक्री करत गुंतवणूकदारांनी नफा कमावण्याचं धोरण स्वीकारल्याचं दिसून आलं. सेन्सेक्स १२३६ अंकांच्या घसरणीसह ८२४९८.१४ वर बंद झाला. तर निफ्टी ५० मध्ये ३६५ अंकांची घसरण होऊन निर्देशांक २५४५४.३५ अंकांवर बंद झाला.

### शेअर बाजारात घसरण, गुंतवणूकदारांचे ८ लाख कोटी बुडाले

बीएसई १५० मिडकॅप निर्देशांक १.५४ टक्क्यांनी घसरला. तर, बीएसई २५० स्मॉलकॅप निर्देशांक १.१६ टक्क्यांनी घसरला. शेअर बाजारातील घसरणीमुळं बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ४७२ लाख कोटींवरून ४६४ लाख कोटींवर आलं आहे.

बाजार विश्लेषकांच्या मते शेअर बाजारातील घसरणीचं प्रमुख कारण भू राजनैतिक तणाव हे आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षाच्या शक्यतेनं गुंतवणूकदार सतर्क झाले आहेत. मध्य पूर्व म्हणजेच आखाती देश संपूर्ण जगाला क्रूड ऑईलचा पुरवठा करतात. स्ट्रेट ऑफ हॉर्मुज कच्च्या तेलाच्या निर्यातीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या ठिकाणी अडथळा निर्माण झाल्यास कच्चा तेलाचे दर वाढू शकतात. जागतिक स्तरावर महागाई वाढू शकतो आणि शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

सलग तीन दिवसांच्या तेजीनंतर शेअर बाजारात नफा वसूल करण्याचा ट्रेंड पाहायला मिळालं. सेन्सेक्स आणि निफ्टीत गेल्या तीन दिवसात १.४ टक्क्यांची तेजी दिसून आली होती.

शेअर बाजारातील घसरणीचं प्रमुख कारण कच्चे तेल महाग होणे हे देखील आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य तणावाच्या शक्यतेनं ब्रेंट क्रूड ऑईलचा दर ७० डॉलर प्रति बॅरल पर्यंत राहू शकतो. खनिज तेलाच्या दरात वाढ झाल्यास त्याचा भारतासारख्या खनिज तेल आयातदार देशाला मोठा फटका बसू शकतो, यामुळं गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे.

बँकिंग शेअरमध्ये घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. कोटक महिंद्रा बँक, एक्सिस बँक, इंडसइंड बँकच्या शेअरमध्ये घसरण झाली. श्रीराम फायनान्स, बजाज फायनान्स, एसबीआय लाईफ इन्शुरन्सच्या शेअरमध्ये घसरण झाली.



## Change In Name

MY OLD NAME IS **VARSHA SHRIRAM SUDEWAD** WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME **VARSHA SANTOSH NAGALWAD** HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME. **ADDRESS: VARSHA SANTOSH NAGALWAD** W/o **SANTOSH NAGALWAD** NEAR Sharda Nagar Nandigram Housing Society Nanded-431602
Mo. No. 9021458196, 7030941155

## Change In Name

MY OLD NAME IS MOHAMMED RAFIQUE WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME MOHAMMAD RAFIK SHAIKH CHAND HENCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE CONSIDER THE SAME.
ADDRESS: MILLAT NAGAR, RAILWAY STATION, MUDKHED TQ. MUDKHED, DIST. NANDED - 431806





फेरफाराची नोटीस

नमुना ९
[ नियम १४ व २४ पहा ]
महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० ( २ ) अन्वये सूचना

गाव :- भोकर

ज्याअर्थी तालुका :- भोकर

गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहे ते भुमापन व उपविभाग क्रमांक |
|---|---|---|
| 12289 | नोदीचा प्रकार:- खरेदी#माहिती मिळालेचा दिनांक:- 09/02/2026# फेरफाराचा दिनांक:- 10/02/2026 लिहुन देणार:- सुभाष भास्करराव बिंदू रा. भोकर(खाता क्रमांक943) यांचे गट/सर्व्हे क्रमांक554, लागवडीयोग्य क्षेत्र 1.4844 हे.आर.चौ.मी पैकी लागवडीयोग्य क्षेत्र 0.0222 हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र 0.0000 हे.आर.चौ.मी हे त्यांनी सदरील गट क्र.554 मध्ये प्लॉटिंग असुन खरेदीखतावर गट क्र. नसल्यामुळे ग्राममहसुल अधिकारी यांनी दि.02/02/2026 रोजी जायमोक्यावर जाऊन पंचासमक्ष पंचनामा केला करिता नोंद घेण्यात आली मंजुरीस्तव सादर लिहुन घेणार : योगेश पुंडलीकराव थळंगे , (खाता क्रमांक :-11556)गट/सर्व्हे क्रमांक 554 लागवडीयोग्य क्षेत्र 0.0222 हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र 0.0000 हे.आर.चौ.मी यांना दुय्यम निंबधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक 941 दिनांक 03/06/2014 प्रमाणे रक्कम रुपये 40000 घेऊन खरेदी दिली.सबब खरेदी घेणा-याचे नाव गाव नमुना नं. 7/12 वर दाखल केले. | 554 |

आणि ज्याअर्थी , तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन / फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते ; आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे.
त्याअर्थी आता मी, अनिल तुकाराम मुनेश्वर
ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा तलाठी याव्दारे , उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत , उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास , ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. तलाठी **भोकर** यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास , उक्त नोंदीस तुमची संमती आहे , असे गृहीत धरले जाईल , कृपया याची नोंद घ्यावी .

ठिकाण : भोकर
दिनांक : 10/02/2026

(अनिल तुकाराम मुनेश्वर)
तलाठी साझा भोकर
ता भोकर जि नांदेड

| नाव | पत्ता | सही |
|---|---|---|
| चावडीवर नोटीस प्रदर्शित केल्याची तारीख | | |
| योगेश पुंडलीकराव थळंगे | -- | |
| सुभाष भास्करराव बिंदू | -- | |



## जाहीर प्रगटन

भारत अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड ता. जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सभासद/मतदारांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची संचालक मंडळ निवडणुक सन २०२६- २०३१ या कालावधीचा निवडणुक कार्यक्रम दिनांक २०/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येत असुन उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कालावधी दिनांक २०/०२/२०२६ ते २६/०२/२०२६ आहे. प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक २७/०२/२०२६ रोजी करण्यात येणार असुन वैध नामनिर्देशन पत्राची यादी दि. ०२/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी दिनांक ०२/०३/२०२६ ते १६/०३/२०२६ आहे. निवडणुक लढविणा-या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतीम यादी प्रसिध्दी दिनांक १७/०३/२०२६ करण्यात येणार आहे. आवश्यकता असल्यास मतदान दिनांक २८/०३/२०२६ रोजी उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयात घेण्यात येणार असुन मतदान संपल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात येणार आहे. व निकाल जाहीर करण्यात येणार आहे संस्थेच्या निवडणुकीचा निवडणुक कार्यक्रम संस्थेच्या व उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड यांचे कार्यालयाचे नोटीस बार्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे यांची सर्व सभासद/मतदारांना नोंद घ्यावी.

(एस.एस.जळके)
निवडणूक निर्णय अधिकारी
भारत अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट
सोसायटी लि. नांदेड ता. जि. नांदेड.

## प्लॉट विकणे आहे

डी मार्ट समोरील शिवरोड लगत गट क्रमांक १३३ मधील सूर्यनगरातील दोन प्लॉट विकणे आहे. प्लॉट क्रमांक ५ व ६. साईज ३० बाय ६०. १८०० चौरस फुट. पूर्वमुखी प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

**संपर्क- मो. ९३७०७४८६०२**

## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**



## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नवीन नांदेडसह ग्रामीण भागात शिवजन्मोत्सव सोहळ्याचा मोठा उत्साह

## जय भवानी, जय शिवाजीचा जयघोष



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नवीन नांदेडमधील सिडको, हडको परिसरासह ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव सोहळा मोठा उत्साह पाहायला मिळाला. विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत हा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासहित अनेकांचा मोठा सहभाग होता. ढोल ताशांच्या गजरात जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय असा जयघोष करीत शहरातील मुख्य रस्त्याने मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत लेझीम पथकाच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी विविध सामाजिक संघटना, प्रतिष्ठान तसेच व्यापाऱ्यांच्या वतीने अन्नदान, पाणपोईची व्यवस्था करण्यात आली होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून मुख्य मिरवणुकी निघाली. या मिरवणुकीत उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, उदय देशमुख, सतिश बस्वदे, राजू लांडगे, माजी नगरसेविका सौ. ललिता शिंदे, डॉ. करुणा जमदाडे यांच्यासह डॉ. नरेश रायेवार, नांदेड दक्षिण शिवसेना जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, तुलजेश यादव, अक्षय रावत, साहेबराव मामीलवाड, माजी नगरसेवक संजय इंगेवाड, मधुकर गायकवाड, महेश शिंदे, भगवानराव ताटे, सोपान पांडे, मयुर अंमिलकंठवार, ज्योती कदम यांच्यासह जयंती मंडळ अध्यक्ष साहेबराव मोरे, दीपक भरकड, दिलीप कदम, साहेबराव गाढे, संदीप कदम यांच्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड पदाधिकारी व महिला, विविध राजकीय पक्षांचे व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्य मिरवणुकीमध्ये सिडको-हडको परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदरील मुख्य मिरवणूक हडको, ज्ञानेश्वर नगर, अण्णाभाऊ साठे पुतळा, सिडको, शिवाजी चौक मार्ग जिजाऊ सृष्टी येथे संपन्न झाली. मिरवणूक मार्गावर अनेक ठिकाणी शिवजयंतीनिमित्त शुभेच्छा फलकासह विविध प्रतिष्ठानच्या वतीने अन्नदान, पाणपोईची व्यवस्था करण्यात आली होती.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या वाघाळा, वसरणी, जुना कौठा, नवीन कौठा, असदवन, असरजन यासह विष्णुपुरी, धनेगाव, वाजेगाव, बळीरामपूर, बाभुळगाव, तुप्पा, कांकाडी, गुडेंगाव, भायेगाव, राहेगाव, किक्की, मार्कंड, गावासह अनेक गावांत शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शांततेत पार पाडावी यासाठी नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, बाळासाहेब रोकडे, सचिन गढवे, रेखा काळे, विजय कांबळे, पोलीस अंमलदार, होमगार्ड यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# शिवरायांचा जयघोष, आतीषबाजी, टाळ-मृदंग, लेझीम; लोह्यात शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा



**लोहा (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयजयकार.. एकच राजा इथे जन्मला शिवनेरी किल्ल्यावर.. या गीतावर तरुणांचा जल्लोष, टाळ-मृदंग ..लेझीम, शहरात भगवेमय वातावरण...आकर्षक रोषणाई ...फटाक्यांची आतीषबाजी करीत लोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते जुन्या शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक झाल्यानंतर शिवजयंती मिरवणुकीस सुरुवात झाली.

दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी लोहा शहरात शिवजन्मोत्सव सोहळा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकाराने साजरा केला जातो. मुख्य चौकातील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास नेत्रदीपक रोषणाई व सजावट करण्यात आली होती. बुधवारी रात्रीपासूनच शिवप्रेमींनी अभिवादनासाठी गर्दी केली होती.

दुपारी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार सुभाष साबणे, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, सचिन पाटील चिखलीकर, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले व मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

जुन्या शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार सुभाष साबणे, युवा नेते प्रवीण पाटील पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, केशवराव मुकदम यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर मिरवणुकीतील शिवरायांच्या पुतळ्यास प्रतापराव पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, भास्कर पवार, जयंती मंडळाचे सुधाकर पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम माजी सभापती आनंदराव पाटील नगरसेवक हरिभाऊ चव्हाण जयंती मंडाचे अध्यक्ष सुधाकर पाटील, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, नगरसेवक गणेश बगाडे, सतीश निखाते, बी. डी. जाधव, केतन खिल्लारे, काळे गुरुजी, अभंग पाटील, भानुदास पाटील, हणमंत पवार, श्रीकांत पाटील यासह शहर व आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून मोठ्या संख्येने विविध जाती, धर्माचे नागरिक व शिवप्रेमी सहभागी झाले होते. अनिल धुतमल यांनी वाहन सजावट केली होती. क्रीडा शिक्षक दिलीप कहाळेकर यांचे लेझीम पथक, तसेच टाळ, मृदंग, अश्व यासह विविध देखावे मिरवणुकीत सहभागी झाले होते. शहरात भगव्या कमाणी, झेंडे लावण्यात आहे होते. मंडळाचे अध्यक्ष सुधाकर पाटील व सहकाऱ्यांनी हा उत्सव साजरा होण्यासाठी मेहनत घेतली. सकाळपासूनच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. मिरवणुकीत पोलीस निरीक्षक आयलाने व पथकाने बंदोबस्त लावला होता.जागोजागी पाण्याची व फराळाची व्यवस्था शिवप्रेमींनी केली होती.

# शिक्षा भोगत असलेला व पॅरोलवर सुटलेला चार वर्षांपासूनचा फरार आरोपी बिलोली पोलिसांनी पकडला

**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली पोलिसांना पाहिजे असलेला व एका गंभीर गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेला फरार आरोपी पोलिसांनी अटक केला.

संबंधित आरोपीविरुद्ध बिलोली ठाण्यात गु.र.नु. ३३७/२०२४ कलम २२४ भादवीमधील संजय मोतीराम चव्हाण (वय ४३ वर्ष रा. जोशी गल्ली देगलूर ता. देगलूर, जि. नांदेड) यास पो. स्टे. देगलूर येथील गु.र.नं. ०५/२००१ कलम ३०७,४५२ भादवीमध्ये छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे शिक्षा भोगत असताना त्यास अभिवचन (पॅरोल) रजेवर मुक्त करण्यात आले होते. त्यानंतर सदर आरोपी हा छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह येथे परत हजर न होता फरार राहिला होता. त्यावरुन कारागृह विभागाचे प्रतीक प्रकाश इंगोले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपीचा शोध घेतला. अखेर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

न्यायालयाने सदर आरोपीस न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सदर कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक करुन अभिनंदन केले आहे.

# मनपाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** अखंड भारताचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती नांदेड शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहरातील शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास्थळी दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता महापालिकेतर्फे महापौर कविता संतोष मुळे यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




यावेळी उपमहापौर दीपकसिंह रावत आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनीही शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली.

याप्रसंगी बोलताना महापौर कविता मुळे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांचे कार्य हे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचे सुशासन, शिस्त आणि रयतेच्या कल्याणाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प आज आपण केला पाहिजे. नांदेड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महाराजांचे विचारच आमचा मार्गदर्शक दीप असतील.

# माधवराव पाटील शेळगावकर गौरव सोहळा व आत्मचरित्राचे रविवारी प्रकाशन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्रातील ज्येष्ठ समाजसेवक तथा महाराष्ट्र राज्य ग्रामस्वच्छता समितीचे प्रथम अध्यक्ष स्वच्छतादूत माधवराव पाटील शेळगावकर यांचा कार्यगौरव सोहळा व 'माझी ग्रामविकासाची शेती' या आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांच्या हस्ते होणार आहे.



हा सोहळा रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ठिक ११ वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती निर्मल प्रकाशनचे निर्मलकुमार सूर्यवंशी व माधवराव पाटील शेळगावकर गौरव समितीचे राजेश देशमुख कुंटूरकर, माजी सनदी अधिकारी एकनाथ मोरे,उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, दिलीपराव धर्माधिकारी, प्रा. प्रभाकर पवार, इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर, संगमेश्वर लांडगे व प्राचार्य संजय पाटील शेळगावकर यांनी दिली आहे.

माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असलेल्या या सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, पद्मश्री पोपटराव पवार, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, हळद संशोधन केंद्र अध्यक्ष आमदार हेमंत पाटील, प्रा. खा. रवींद्र चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, खा. नागेश पाटील आष्टीकर, माजी केंद्रीय मंत्री सूर्यकांता पाटील, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, माजी मंत्री डी. पी. सावंत, मराठा सेवा संघाचे संस्थापक इंजि. पुरुषोत्तम खेडेकर, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. बालाजी कल्याणकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

माधवराव पाटील शेळगावकर यांच्या आत्मचरित्र प्रकाशन व गौरव सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी व साहित्यप्रेमी युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन इंजि बळवंत पाटील, राज पाटील शेळगावकर, अभिमन्यू शहाजी पाटील, शिवराज पाटील, विजय पाटील व समस्त शेळगाव गौरी ग्रामस्थांनी केले आहे.

# अविनाशराव पांडे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** अंबिकानगर येथील ज्येष्ठ नागरिक अविनाशराव पांडे (मुळावकर) (वय ८६ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली, सून, जावई, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. बीएसएनएलमधील सेवानिवृत्त अधिकारी अभिजित पांडे यांचे ते वडील होत.






**नांदेड** : प्रणिताताई देवरे-चिखलीकर यांच्या जिजाऊ माँ साहेब महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटीचे उद्घाटन लोहा-कंधार विधानसभेचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आ. सुभाष साबणे, माजी आ. मोहनराव हंबर्डे, शिवराज पाटील होटाळकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. (छाया : सचिन डोंगळीकर)

# प्रा. सुभाष भगत यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सम्राट नगर येथील सेवानिवृत्त प्राध्यापक सुभाष सोमाजीराव भगत (वय ६०) यांचे बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११.३० वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार, दि १९ रोजी दुपारी १२.३० वा. गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी जयश्री, एक मुलगा व एक मुलगी, असा परिवार आहे. खुराजी भगत यांचे ते धाकटे बंधू होत.



# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अर्धापुरात आरोग्य व रक्तदान शिबीर; शेकडो नागरिकांनी घेतला लाभ



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अर्धापूर येथे आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात केवळ आरोग्य तपासणीच नाही, तर गरजू रुग्णांवर प्रत्यक्ष औषधोपचारही करण्यात आले. या शिबिराला शिवप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार व अभिवादन करून करण्यात आली. 'जय भवानी, जय शिवाजी', 'जय जिजाऊ, जय शिवराय' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सामाजिक बांधीलकी जपत शिवजयंती साजरी करण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या शिबिरामध्ये नागरिकांसाठी विविध आरोग्य चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबिरात तरुणांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जोपासली. मधुमेह व रक्तदाब तपासणी अनेकांनी करून घेतली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रकारच्या आजारांचे निदान करण्यात आले. केवळ तपासणीवर न थांबता, पात्र रुग्णांना जागेवरच आवश्यक औषधी उपलब्ध करून देण्यात आली. या सामाजिक उपक्रमाला प्रशासकीय आणि पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी भेटी देऊन आयोजकांचे कौतुक केले. यावेळी प्रामुख्याने उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ, नायब तहसीलदार राजेंद्र शिंदे, गटविकास अधिकारी यू. डी. तोटावाड, ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. विद्या झिने, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णूकांत कराळे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, सुभाष मुंगल, डॉ. उत्तम इंगळे, डॉ.विशाल लंगडे, डॉ. युवराज डाढाळे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि सर्वपक्षीय पदाधिकारीसह शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ए.आय.चे ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज

## कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांचे पत्रकारांना आवाहन

**नांदेड (प्रतिनिलधी)–** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) बद्दल भीती न बाळगता ते शिकून घ्यावे. एआयमुळे कार्यालयीन कामकाज करण्यास खूप मदत होते. जवळपास सर्वच क्षेत्रात ए.आय. ची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. एआयचा वापर करतांना त्याला विचारात येणारे प्रश्न जर योग्यरीत्या विचारले तर आपणांस चांगल्या प्रकारची माहिती प्राप्त होते. यामुळे वेळेची बचत होते. त्यामुळे पत्रकारितेच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे प्रभावी साधन ठरत असून, त्याची भीती न बाळगता ते आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे मत कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले.



ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिसभा सभागृहात दि. १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी आयोजित आधुनिक पत्रकारिता कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण, तसेच मार्गदर्शक म्हणून डॉ. श्रीराम पवार, विशाल पाटील, फराह खान, नंदकिशोर पाटील, प्रियदर्शनी हिंगे, संतोष शाळीग्राम, डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी संयोजन केले.

पत्रकारितेत माहितीवरील मक्तेदारी संपुष्टात आली असून प्रत्येक व्यक्ती कंटेंट निर्माण करू शकते, असे मत ज्येष्ठ संपादक व विचारवंत, दै.सकाळ, पुणेचे डॉ. श्रीराम पवार यांनी मांडले. अशा परिस्थितीत सत्य पडताळणी, संदर्भांची अचूकता आणि सार्वजनिक हिताची जाणीव हेच पत्रकारांचे वैशिष्ट्ये ठरते, असे त्यांनी सांगितले. वेगाच्या स्पर्धेत संवेदनशीलता आणि सत्यता अबाधित ठेवणे हीच खरी कसोटी असल्याचे त्यांनी नमूद केले. तर लोकशाही, मुंबईचे मॅनेजिंग एडिटर विशाल पाटील यांनी संवाद कौशल्य, स्पष्टता आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान हे केवळ सहाय्यक साधन असून पत्रकारितेचा केंद्रबिंदू नागरिकांच्या प्रश्नांवरच असावा, असे त्यांनी स्पष्ट केले. आणि दैनिक लोकमत, छत्रपती संभाजीनगरचे संपादक नंदकिशोर पाटील यांनी पत्रकारिता ही सतत शिकत राहण्याची प्रक्रिया असल्याचे सांगत व्हायरल संस्कृतीच्या काळात संयमी आणि तथ्याधारित वृत्तांकनाची गरज अधिक असल्याचे नमूद केले. यावेळी न्यूज १८ मराठी, मुंबईच्या सहसंपादक फराह खान यांनी एआयमुळे शोध पत्रकारिता, डेटा विश्लेषण आणि तथ्य पडताळणी अधिक प्रभावी होत असल्याचे सांगितले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com